सत्यशोधक आत्मे

लेखक
इरफान खलीली

मराठी भाषांतर
झाहिद इब्ने आबिदखान

अनुक्रमणिका

कायापालट	५
नक्कीच ते प्रेषित आहेत	१०
खुनी - जो गुलाम झाला	१६
अनोळखी व्यक्ती	२०
स्थलांतर	२८
शेवटी शांतता प्राप्त झाली	४१
एक स्थान व तीन प्रवासी	४५
जादू नव्हे.....!	५२
कृपेच्या छत्रछायेत	५६
एकटा हुतात्मा	६१

ह्या केवळ काल्पनिक कथा नाहीत. ह्या तर अमर व उज्वल सत्य घटना आहेत ज्या याच धरतीवर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनकाळात घडल्या होत्या. त्याना केवळ कथानकाचे स्वरूप देण्यात आले आहे.

या दहा घटनावजा कथांमध्ये प्रेषित्वाची सत्यता, ईशवाणीचे आकर्षण, सत्याचा शोध व प्रेमाच्या वेदना सामील आहेत.

अल्लाहच्या कृपेने या कथानकांच्या अध्ययनाने आपणास लाभ प्राप्त होईल व हृदयात श्रद्धा व जाज्वल्य निर्माण होईल.

कायापालट

"अब्दुल्लाहच्या आई, कुठे जाण्याची तयारी करीत आहात?" खत्ताबचे पुत्र उमर (रजि.) यांचा प्रश्न ऐकून त्या किंचित दचकल्या व विवंचनेत पडल्या. कारण त्यांना माहीत होते की उमर (रजि.) इस्लामचे कट्टर विरोधक आहेत व मुस्लिमांना त्रस्त करण्याकामी अग्रेसर असतात. तरीही लैला (रजि.)ने निर्धास्त होऊन खत्ताबच्या मुलाला उमर (रजि.)ला उत्तर दिले,

"आम्ही सर्वांनी देश सोडून जाण्याचा निश्चय केला आहे."

"का बरं!" उमर (रजि.) यांनी चकित होऊन विचारले.

"देश सोडून जायच नाही तर जीव द्यायचा काय?" लैला (रजि.) यांनी प्रभावीपणे उत्तर दिले, "मक्का शहरात आमचे जीवन कठीण झाले आहे. तुम्ही आम्हाला त्रस्त करण्याचा बेत केला आहे."

अब्दुल्लाहची आई कातर स्वरात बोलत होती. "आता जोपर्यंत आमच्यासाठी अल्लाह सुख-शांतीचा मार्ग मोकळा करीत नाही तोवर आपल्या घरादारापासून दूरच राहू."

अब्दुल्लाहच्या आईच्या कातर स्वराने उमर (रजि.) विचलित झाले. ते उदास झाले, पण ते काही करू शकत नव्हते.

"अल्लाह तुमची सुरक्षा करो, अब्दुल्लाहच्या माते." असे बोलत ते एका बाजूला झाले. ते हळूहळू पाय उचलत होते. ते गंभीरपणे विचार करीत होते. ते दुःखाने बोलू लागले.

"या सर्व परिस्थितीला मुहम्मद (स.) कारणीभूत आहेत. त्यांच्यामुळे कुरैश लोकांत बिघाड निर्माण झाला आहे व आपसांत मतभेद निर्माण झालेत. कुटुंब विभक्त झालेत, भावा-भावांमध्ये वैमनस्य निर्माण झाले. या सर्व परिस्थितीचा अंत करण्यासाठी मुहम्मद (स.) यांची हत्याच होणे आवश्यक आहे."

असे बडबडत ते त्यांच्या घराकडे निघून गेले.

(२)

हातात तलवार, डोळे लालबुंद व चेहरा रागाने उग्र झालेला, अशा बेभान अवस्थेत उमर (रजि.), अक्रमच्या घराकडे जात होते. रस्त्यात अब्दुल्लाहचे पुत्र माननीय नईम (रजि.) यांच्याशी भेट झाली. त्यांनी गुप्तपणे इस्लामचा स्वीकार केला होता. त्यांनी उमर (रजि.)ला उग्र अवस्थेत जाताना पाहिले. त्यांच्याबद्दल सांशक होऊन त्यांनी उमर (रजि.) यांना विचारले. "हे खत्ताबपुत्रा ! कुठे निघालास?"

"समूळ नष्ट करायला निघालो आहे !" उमर (रजि.)ने आपला दृढ निश्चय व्यक्त केला.

"कोणाला नष्ट करायला निघालांत !" नईम (रजि.) यांनी विचारले,

"त्यालाच, जो स्वत:ला अल्लाहचा पैगंबर समजतो."

उमर (रजि.)ला भयंकर रागात बघून माननीय नईम (रजि.) चिंतित झाले. ते विचारमग्न झाले. ते उमर यांचा राग नष्ट करण्याचा विचार करु लागले. ते त्यांचे मन-परिवर्तन करण्याचा विचार करु लागले. म्हणून ते बोलू लागले. अंततः ते बोलले, "ईश्वर शपथ आपण भ्रमिष्ट झालात."

"म्हणजे?" हे शब्द उच्चारुन उमर (रजि.) अचानक स्तब्ध झाले.

"उमर (रजि.) !" मुहम्मद (स.) यांची हत्या करुन परिस्थिती बदलू शकणार नाही." नईम (रजि.) यानी हळूवारपणे उमर (रजि.) यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.

"ते कसे ?" उमर (रजि.) यांनी गर्जदार आवाजात विचारले.

"ही आग बऱ्याच घरांपर्यंत पोहचली आहे. इतरांचे सोडा. तुम्ही तुमच्या कुटुंबियांबाबत चौकशी करा." माननीय नईम (रजि.) यांनी मोठ्या शिताफीने उमर (रजि.) यांचे ध्यान वळविले.

उमर (रजि.) यांना झटका लागला. त्यांनी आश्चर्यचकित होऊन माननीय नईम (रजि.) यांना विचारले, "उघडपणे बोला, कुटुंबियाबाबत म्हणजे कोणाबाबत?"

"तुमचे दाजी सईद (रजि.) व तुमची बहीण फातिमा (रजि.) यांनीही इस्लाम धर्माचा स्वीकार केला आहे." माननीय नईम (रजि.) यांनी बोचऱ्या स्वरात उत्तर दिले.

हे ऐकताच उमर (रजि.) यांच्या तळ पायाची आग मस्तकाला जाऊन भिडली. त्यांचा चेहरा रागाने लालबुंद झाला. ते लगेच त्यांच्या दाजीच्या घराकडे वळले.

(३)

उमर (रजि.)ने दरवाज्याची साखळी इतक्या जोरात वाजविली की घरातले लोक घाबरले गेले.

"कोण....?" घरातून फातिमा (रजि.)ने विचारणा केली !

"मी आहे, खत्ताब-पुत्र उमर (रजि.)" उमर (रजि.)ने गर्जदार आवाजात उत्तर दिले.

उमर (रजि.)चे उत्तर ऐकून सर्वांना भीती वाटली. त्या वेळी नवरा-बायको दोघेजन माननीय खब्बाब बिन अरत (रजि.)च्या जवळ बसून पवित्र कुरआनाचे अध्ययन करीत होते. माननीय खब्बाब (रजि.) घरात एका कोपऱ्यात लपून बसले. माननीय सईद (रजि.) यांनी दार उघडले. उमर (रजि.) सिंहासारखे घरात शिरले. त्यांचे डोळे त्या अपरिचित व्यक्तीला शोधत होते, ज्याचा आवाज त्यांनी बाहेरुन ऐकला होता. परंतु घरात नवरा-बायकोशिवाय तिसरी व्यक्ती दिसली नाही, तेव्हा ते क्रोधित होऊन ओरडले,

"तुम्ही काय वाचत होते?"

भयभीत झाल्यामुळे दोघांपैकी कोणीच उत्तर दिले नाही.

"मला माहीत झाले आहे की तुम्ही दोघांनी आपल्या पूर्वजांचा धर्म सोडून नवा धर्म स्वीकारला आहे." उमर यांच्या तोंडातून जणू आग ओकली जात होती.

"जर पूर्वजाच्या धर्मात सत्य नसेल तर त्याऐवजी दुसरा धर्म ज्यात सत्य दिसून येत असेल मग तो स्वीकारला जाऊ शकत नाही का?" माननीय सईद (रजि.) यांनी उत्तर देण्याचे धैर्य दाखविले.

दाजीच्या उत्तराने उत्तेजित होऊन उमर (रजि.) त्यांच्यावर तुटून पडले. पतीला मार खाताना पाहून फातिमा (रजि.) पुढे सरसावल्या. उमर (रजि.)ने त्यांनाही बदडून काढले. त्यांनी इतक्या जोरात फटका मारला की डोक्याला खोच पडली व त्यातून रक्त वाहू लागले. फातिमा (रजि.) ही उत्तेजित झाल्या व बिथरलेल्या सिंहीणीसारख्या गर्जल्या.

"उमर (रजि.) ! तू जर खत्ताबचा मुलगा आहेस तर लक्षात ठेव मी त्यांची मुलगी आहे. तुला जे करायचे असेल ते खुशाल कर. आम्ही आता इस्लाम कधीच सोडणार नाही."

बहिणीची निर्धास्त वाणी व खंबीरपणाने उमर (रजि.)चे धैर्य खचले गेले व राग शांत झाला. बहिणीच्या डोक्यातून रक्त वाहताना पाहून त्यांना पश्चात्ताप वाटू लागला. ते समोर ठेवलेल्या बाकावर बसले. नंतर बहिणीला म्हटले,

"तुम्ही जे काही वाचत होता ते मलाही जरा दाखवा."

“तुम्ही अपवित्र आहात. कुरआनास फक्त पवित्र माणसेच हात लावू शकतात. प्रथम स्नान करुन पवित्र व्हा.” बहिणीने सत्य सांगून टाकले.

स्नान केल्यानंतर उमर (रजि.) यांनी कुरआनाची ती पाने वाचावयास सुरु केली, जी माननीय खब्बाब (रजि.) शिकवीत होते. वाचन करताना उमर (रजि.)च्या चेहऱ्याचा रंग बदलत गेला. जेव्हा त्यांनी वाचले,

“आम्ही यासाठी हा कुरआन तुमच्यावर अवतरला नाही की तुम्ही संकटात पडावे. हे तर एक पुन:स्मरण होय. अशा प्रत्येक इसमासाठी ज्याने भीती बाळगावी. अवतरले गेले आहे त्याच्याकडून ज्याने निर्माण केले पृथ्वी आणि उत्तुंग आकाशांना तो परम दयाळू (सृष्टीच्या) राज सिंहासनावर विराजमान आहे, स्वामी आहे त्या सर्व वस्तूंचा ज्या आकाशात व पृथ्वीत आहेत आणि ज्या माती खाली (भूगर्भात) आहेत.”

(दिव्य कुरआन- २० : २-६)

उमर (रजि.)ने अचानक उच्चारले

“मी साक्ष देतो की अल्लाह शिवाय कोणीही पूज्य नाही व साक्ष देतो की मुहम्मद अल्लाहचे सेवक व पैगंबर आहेत.”

हे शब्द ऐकताच माननीय खब्बाब (रजि.) बाहेर आले व उमर (रजि.) यांना उद्देशून म्हटले, “हे खत्ताबच्या पुत्रा! तू धन्य झालास. या सोमवारी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी प्रार्थना केली होती, “हे अल्लाह! खत्ताब पुत्र उमर (रजि.) व हिश्यामचे पुत्र उमर (अबू जहल) यांच्यापैकी जो तुला प्रिय असेल त्याला इस्लामला सशक्त करण्याची बुद्धी प्रदान कर.” आम्हाला खात्री होती की हे सौभाग्य तुमच्याच वाट्याला येईल.”

“खब्बाब! मला मुहम्मद (स.) यांचा पत्ता सांगा, मला त्यांना भेटून इस्लाम धर्म स्वीकारायचा आहे.” उमर (रजि.) यांनी खब्बाब (रजि.) यांना विनविले.

“पैगंबर मुहम्मद (स.) या क्षणी अक्रमा (रजि.) यांच्या घरी असतील.” खब्बाब (रजि.) यांनी सहर्ष उत्तर दिले.

माननीय उमर (रजि.) अक्रमा यांच्या निवासस्थानाकडे रवाना झाले. उमर (रजि.) यांची बहीण फातिमा (रजि.) व त्यांचे पती सईद (रजि.) आनंदविभोर झाले. काही क्षणांपूर्वी उमर (रजि.) यांनी त्यांच्या घरात इस्लामचा शत्रू म्हणून प्रवेश केला होता व अल्लाह व पैगंबर मुहम्मद (स.) यांना नाकारले होते. आता ते घरातून बाहेर पडताना त्यांचा कायापालट झाला होता. ते एकेश्वरवादी झाले होते. मुहम्मद (स.) यांना अल्लाहचे पैगंबर म्हणून मान्य करु लागले होते. ते कुरआनास ईशग्रंथ मानू लागले होते. ते एकेश्वरवादी होऊन एकेश्वरत्वाच्या स्त्रोताकडे धावत चालले होते.

(४)

अक्रमा (रजि.) यांच्या दाराची साखळी वाजली. मात्र साखळीचा आवाज कर्कश नव्हता. माननीय सईद (रजि.) यांच्या घराची साखळी ज्या त्वेशाने उमर (रजि.)ने वाजवली होती, तो त्वेश सौम्य झाला होता. आता त्यांच्या स्वभावातला त्वेश व क्रोधाचा लोप झाला होता. आता त्यांच्या वर्तनात आदर व सन्मानाची भावना निर्माण झाली होती.

"कोण आहे?" घरातून माननीय बिलाल (रजि.) यांनी विचारणा केली.

"मी खत्ताबपुत्र उमर (रजि.) आहे" माननीय उमर (रजि.) उत्तरले.

माननीय उमर (रजि.) यांचा आवाज ऐकून माननीय बिलाल (रजि.) अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याजवळ गेले व निवेदन केले,

"हे अल्लाहच्या पैगंबरा! दारात खत्ताबपुत्र उमर (रजि.) आले आहेत." मला दार उघडताना भय वाटत आहे. ते आत येऊन गडबड करतील अशी भीती वाटते!"

"दार उघडा! अल्लाहने त्यांना सुबुद्धी प्रदान केली असेल तर ते निश्चितच स्वागतास पात्र आहेत." मुहम्मद (स.) यांनी बिलाल (रजि.) यांना धीर दिला.

"जर ते वाईट उद्देशाने आले असतील तर माझी तलवार त्यांचा सामना करण्यास पुरेशी आहे." असे म्हणत माननीय हमजा (रजि.) उभे राहिले.

दार उघडले गेले व माननीय उमर (रजि.) यांनी घरात प्रवेश केला. ज्याक्षणी माननीय उमर (रजि.) यांनी घरात प्रवेश केला त्याच क्षणी माननीय हमजा (रजि.) आणि माननीय जुबेर (रजि.) यांनी त्यांचा जरासुद्धा विरोध केला नाही. उमर (रजि.) यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या समक्ष उभे केल्यानंतर मुहम्मद (स.) यांनी त्यांना सोडून देण्याचा आदेश दिला.

उमर (रजि.) यांना मुक्त करण्यात आले. ते मुहम्मद (स.) यांच्या समोर गुडघे टेकून बसले. मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या सदऱ्याचा कोपरा धरून ओढला व हास्यवदनाने म्हटले, "खत्ताबपुत्रा, इस्लामचा स्वीकार कर!" नंतर त्यांनी अल्लाहची प्रार्थना केली, "हे अल्लाह ! उमर (रजि.)ला सुबुद्धी प्रदान कर".

त्याच क्षणी माननीय उमर (रजि.) यांच्या तोडून "कलम-ए-तौहीद" घोषित झाले. माननीय उमर (रजि.)चे शब्द ऐकताच तेथे हजर असलेल्या सहकाऱ्यांच्या आनंदाची सीमा राहिली नाही. त्यांनी इतक्या उंच आवाजात "अल्लाहु अकबर"च्या घोषणा दिल्या की मक्का शहर दणाणून गेले.

नक्कीच ते प्रेषित आहेत.

"बंधुराज - आपले स्वास्थ्य तर ठीक आहे ना?" अनीस यांनी अबू जर गफ्फारी (रजि.) यांना संबोधिले.

"ठीक आहे - बाकी सर्व ठीकठाक आहे ना?" अबू जर (रजि.) यांनी गंभीर स्वरात विचारणा केली.

"तुम्हाला बऱ्याच दिवसांपासून शांत व गंभीर असल्याचे पाहतोय!"

"तसं काही विशेष कारण नाही." अबू जर (रजि.) म्हणाले.

"तरीपण तुमच्या मौनाचे काहीतरी कारण असेल ना?" अनीस यांनी कारण जाणून घ्यायचा आग्रह केला.

"कारण आहेही व नाहीही." अबू जर (रजि) जास्तच गंभीर होत म्हणाले.

"बंधुराज, आपण तर उगीचच विषयाला काव्याचे स्वरुप देत आहात." अनीस यांनी विनवणी केली.

"तुम्ही तर कवी आहात. मी कवी नाही." अबू जर (रजि.) यांच्या ओठांवर हास्य उमटले.

"बंधुराज! तुम्ही विषयांतर करण्याचा प्रयत्न करु नका." अनीस यांनी पुन्हा आग्रह केला, "मी आपल्या उदासीनतेचे कारण जाणून घेईनच.

ठीक आहे. पण प्रथम एक काम कराल." अबू जर (रजि.) यांनी बंधु अनीस यांच्यापुढे अट मांडली.

"आपली अट तर सांगा." अनीस पटकन उत्तरले.

"माझ्यासोबत मक्का येथे याल का?" अबू जर (रजि.) यांनी विचारणा केली.

"का? काही विशेष?" अनीस यांनी आश्चर्य प्रकट केले.

"तुम्ही ऐकले असेल की तेथे हाशिम परिवारातील एका सदस्याने पैगंबर होण्याची घोषणा केली आहे." अबू जर (रजि.) यांच्याकडे प्रश्नार्थी मुद्रेने विचारले.

"होय, मी पण तसे ऐकले आहे." अनीस यांनी गंभीरपणे होकार दिला.

"जरा जाऊन सत्य तर जाणून घ्या, ते कोण आहेत व ते काय म्हणतात?"अबू जर (रजि.) यांनी अत्यंत उत्साहात आपली जिज्ञासा व्यक्त केली.

''ठीक आहे, मी आजच प्रस्थान करीन.'' अनीस यांनी मक्का येथे जाण्याची तत्परता दर्शविली.

''पण अनीस्! लवकर येण्याची कृपा करा. तेथे मुक्काम करु नका.'' अबू जर (रजि.) यांची जिज्ञासा वाढत गेली.

''ठीक आहे, बंधुराज! निश्चिंत राहा, मी त्वरित परत येईन. इतके बोलून त्यांनी घरात प्रवेश केला व प्रवासाची तयारी सुरू केली.''

(२)

''बरेच दिवस लोटून गेलेत अनिस परतले नाही,'' अबू जर (रजि.) एकांतात बसून विचार करीत होते. ''कोणास ठाऊक काय बातमी देतील !''

अचानक समोरुन अनिस येताना दिसले. अबू जर (रजि.) अत्यंत आतुर होऊन त्यांच्याकडे धावत गेले. ''बोला अनिस, काय खबर आणली आहे ?''

''मी स्वत: त्यांना भेटून आलो आहे. त्यांचे नाव मुहम्मद (स.) आहे.'' अनिस यांनी घोड्यावरुन उतरताना तत्परतेने उत्तर दिले.

''मुहम्मद (स.)! किती सुंदर नाव आहे.'' अबू जर (रजि.) काही क्षण शांत राहिले नंतर लगेच विचारले, ''तुम्ही त्यांना प्रत्यक्ष पाहिले आहे काय ?''

''हो हो बंधुराज, मी तर त्यांच्याशी संभाषणही केली.'' अनिस यांनी आपले कपडे झटकताना म्हटले.

''ते कसे आहेत? अनिस.'' यांनी अबू जर (रजि.) यांनी उत्सुकतेने विचारले.

''अत्यंत रुपवान, सुंदर मुखमण्डल, उजळ कपाळ, काळे विभोर डोळे, रेखीव भुवया, पांढरे शुभ्र मोत्यासारखे दात'' अनिस यांनी विस्तारपूर्वक माहिती दिली.

''निश्चित.... निश्चित....!'' अबू जर (रजि.) यांनी डोळे मिटून आनंद विभोर होऊन म्हटले.

''मध्यम बांधा, मधुर वाणी, बोलताना एक एक शब्दाचा अर्थपूर्ण स्पष्ट उच्चार.'' अनिस यांनी वर्णन चालू ठेवले, ''अधिक बोलत नाही व बिल्कुल शांतही

राहत नाहीत, त्यांचे म्हणणे अर्थपूर्ण मात्र संक्षिप्त असते. त्यांचे सहकारी त्यांच्या अवतीभोवती सतत बसलेले असतात. जेव्हा ते बोलतात, तेव्हा त्यांचे सहकारी शांतपणे ऐकतात व त्यांच्याकडून मिळणाऱ्या आदेशाचे त्वरित पालन करतात.''

''खरोखर अनिस! तुम्ही तंतोतंत खरं बोलता.'' जणू अबू जर (रजि.)चे अंतर्मन साक्ष देत होते.

''त्यांना पाहतच राहावे असे वाटते.'' अनिस यांनी आपल्या कथनाला विराम दिला.

''पण त्यांचा संदेश तर सांगाल.'' अबू जर (रजि.) उतावळे झाले होते, ''ते सदाचार अवलंबण्याचा व दुराचारापासून अलिप्त राहण्याचा आदेश देतात.''

''एवढ्याशा वर्णनाने मी संतुष्ट झालो नाही.'' अबू जर (रजि.) यांनी आतुरता व्यक्त केली व म्हणाले, ''मी स्वतः त्यांच्या भेटीस जाईन.''

(३)

अबू जर गफ्फारी (रजि.) काबाच्या आंगणात उभे होते व चारी बाजूला नजरा फिरवीत होते. येणाऱ्या व जाणाऱ्या व्यक्तीकडे निहाळून पाहत होते. पैगंबर (स.) यांना ते ओळखत नव्हते, पण ते कोणासही विचारु इच्छित नव्हते. भावाने दिलेल्या माहितीवरुन ते प्रत्येक व्यक्तीला न्याहाळून ते स्वतः मुहम्मद (स.)ना ओळखण्याचा प्रयत्न करीत होते. यातच त्यांचा संपूर्ण दिवस निघून गेला. ते झमझमचे पाणी पिऊन काबागृहात पडून राहिले.

इतक्यात माननीय अली (रजि.) यांनी काबा मशिदीत प्रवेश केला. त्यांनी एका नवख्या इसमाला काबा मशिदीत आराम करताना पाहिले. त्याच्याजवळ जाऊन उभे राहिले व त्यांनी हा मनुष्य नवखा आहे हे निश्चित केले व हळूच म्हटले,

''हा तर एखादा प्रवासी आहे.''

''होय, मी एक प्रवासी आहे.'' अबू जर (रजि.) यांनी पडल्या पडल्या उत्तर दिले.

''या माझ्यासोबत चला.'' माननीय अली (रजि.)ने त्यांना विनंती केली, अबू जर

(रजि.) उठले व माननीय अली (रजि.) यांच्या बरोबर चालू लागले. तेथेच जेवण झाले व रात्री तेथेच झोपी गेले. माननीय अली (रजि.) व अबू जर (रजि.) यांच्यात कोणतीच चर्चा झाली नाही. सकाळी दोघेही काबा मशिदीत आले. माननीय मुहम्मद (स.) यांची भेट घेण्याची इच्छा माननीय अबू जर (रजि.) यांना बैचेन करीत होती.

सायंकाळी माननीय अबू जर (रजि.) यांनी झमझम चे पाणी प्याले व काबागृहामध्ये पडून राहिले. योगायोग असा की त्या दिवशी ही माननीय अली (रजि.) पुन्हा काबा मशिदीत आले व त्यांनी नवख्या व्यक्तीला आराम करताना पाहिले. त्या व्यक्तीजवळ जाऊन विचारले, "तुम्हाला तुमचे ठिकाण मिळाले नाही का?"

"होय - बंधु." अबू जर (रजि.) यांनी संक्षिप्त उत्तर दिले.

"ठीक आहे. या माझ्यासोबत."

माननीय अली मुर्तजा (रजि.) यांनी अबू जर गफ्फारी (रजि.) यांना आपल्या घरी नेले. जेवण झाल्यानंतर माननीय अली मुर्तजा (रजि.) यांनी विचारले,

"हे बंधु, तुम्ही कोण आहात व कोणते काम घेऊन आलात?"

"दुसऱ्या कोणाला सांगणार नसाल तर सांगतो." अबू जर (रजि.) यांनी उत्तर दिले.

"ठीक आहे कोणास सांगणार नाही." माननीय अली (रजि.) यांनी आपल्या हृदयावर हात ठेवून सांगितले.

"मी असे ऐकले आहे की या शहरात एक व्यक्ती आहे, जो स्वत:ला अल्लाहचा पैगंबर असल्याचे सांगतो." अबू जर (रजि.) इतके बोलून शांत झाले.

"बरं.... पुढे काय ते सांगा." माननीय अली मुर्तजा (रजि.) यांनी त्यांच्याकडे न्याहाळून पाहिले व विचारले.

"मी माझ्या भावाला त्यांच्या बाबत चौकशी करण्याकरिता पाठविले होते." अबू जर (रजि.) यांनी उत्तर शोधण्यास सुरुवात केली, "पण त्याने परतल्यानंतर संतोषनजक उत्तर दिले नाही. म्हणून मी स्वत: त्यांना भेटायला आलो आहे."

"आपले स्वागत आहे, बंधु माझ्याशी तुमची भेट झाली हे फार बरे झाले." माननीय अली (रजि.) यांनी म्हटले, "मी त्यांच्याच भेटीस जात आहे."

"तुम्ही त्यांना भेटायला जात आहात?" माननीय अबू जर (रजि.) त्यांच्या भेटीसाठी तत्पर होऊन चटकन उभे राहिले.

"होय, मी त्यांच्याकडेच जायला निघालो आहे. चला, माझ्यासोबत चला." अली (रजि.) ने म्हटले, "धन्य आहात, धन्य आहात तुम्ही बंधु." अबू जर (रजि.) यांच्या मुखातून शब्द उमटले.

"पण एक अट आहे!" माननीय अली (रजि.) यांनी जरा थांबून म्हटले "कोणती अट?" अबू जर (रजि.) यांनी विचारले.

"प्रथम मी आत जाऊन बघेन." माननीय अली (रजि.) यांनी समजावून सांगितले, "जर लगेच भेट घेणे योग्य नसेल तर मी भिंतीला टेकून उभा राहीन. तुम्ही परत निघून जा."

"मग कधी भेट होईल?" अबू जर (रजि.) भेटीसाठी बरेच आतुर झाले होते. "अल्लाहची इच्छा असेल तर उद्या भेट होईल." अली (रजि.) यांनी सांगितले, "ही अट मंजूर आहे." अबू जर (रजि.) ने त्वरित अट मंजूर केली.

नंतर दोघांनी एकत्र प्रस्थान केले.

(४)

अबू जर (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना इस्लामबद्दल बरेच प्रश्न विचारले. पैगंबर (स.) यांनी अत्यंत समाधानकारक उत्तर दिले. शेवटी अबू जर (रजि.) म्हणाले, "हे अल्लाहच्या पैगंबरा ! आता मला मुस्लिम करुन घ्या.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अबू जर (रजि.) यांना "कलम-ए-तौहीद" वदविला व म्हटले, "अबू जर (रजि.) सध्या ही बाब तुम्ही गुप्त ठेवा व आपल्या गावी निघून जा."

"हे पैगंबर मुहम्मद (स.)! आम्ही सत्याचा स्वीकार करीत नाही का?" अबू जर (रजि.) यांनी निवेदन केले.

"या सत्यापेक्षा मोठे कोणतेच सत्य नाही. जे मी घेऊन आलो आहे व जे तुम्ही स्वीकारले आहे." अल्लाहचे पैगंबर (स.) यांनी मोठ्या उत्साह व विश्वासाने सांगितले.

"मग मला अनुमती द्या की या खोट्या देवी-देवतांची पूजा करणाऱ्यासमोर सत्य प्रगट करुन येथून गावी निघून जाईन." अबू जर (रजि.) यांनी आपली तीव्र भावना प्रकट केली.

"मला त्यांच्या दुष्ट व्यवहाराची आशंका वाटते. ते तुम्हाला कष्ट देतील." अल्लाहचे पैगंबर (स.) यांनी अत्यंत प्रेमळपणे समज दिली.

"मी कष्ट व त्रासाला भीत नाही. अल्लाह शपथ, मी घोषणा करूनच जाईन." असे सांगून अबू जर (रजि.) काबागृहाकडे निघून गेले.

काबागृहाजवळ कुरैश एकत्र झाले होते. अबू जर (रजि.) यांनी त्यांना संबोधून म्हटले, "कलम-ए-तौहीद" वाचा." हे ऐकताच कुरैशाचा राग उफाळून बाहेर पडला,

"मारा, मारा या धर्मभ्रष्टाला मारा."

सर्वजण त्यांच्यावर तुटून पडले. त्यांना इतके मारले की ते मेल्यागत झाले. इतक्यात अब्बास (रजि.) तेथे उपस्थित झाले. त्यांनी अबू जर (रजि.) यांना ओळखले व ओरडून म्हणाले....

"अरे, मूर्खांनो! हा तर गिफ्फार जमातीचा सदस्य आहे, जेथे तुम्ही खजूर विक्रीसाठी जाता. जर हा मेला तर तुमचा व्यापार संकटात येईल."

हे ऐकताच लोक बाजूला झाले, मात्र दुसऱ्या दिवशी जेव्हा अबू जर (रजि.) यांनी सर्वांना ऐकू येईल इतक्या उंच आवाजात 'कलिमा' पठण केले, तेव्हा लोकांनी त्यांना पुन्हा झोडपायला सुरुवात केली. योगायोग असा की अब्बास (रजि.) तेथे धावून आले व मध्यस्थी करुन त्यांना सोडविले.

अंततः अबू जर (रजि.) अल्लाहचे पैगंबर (स.) यांना भेटून यसरब (मदीना) ला रवाना झाले.

खुनी - जो गुलाम झाला

मक्का शहरात शोक पसरला होता. प्रत्येक घरातून किंकाळ्या व रडण्याचा आवाज ऐकू येत होता. घरातील चुली थंडावल्या होत्या व दिवे मालवले गेले होते. रात्रीच्या अंधारात परिस्थिती जास्तच भयावह वाटत होती.

शहराच्या बाहेर एका निर्जन स्थळी दोन मित्र शोकाकुल अवस्थेत बसले होते. दोघांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते.

"उमैर (रजि.)! बद्रच्या पराभवाने तर आमची भलतीच नामुष्की झाली आहे." उमैयापुत्र सफवान यांनी आपल्या दु:खी मनातील वेदना आपल्या सोबतीसमो' मांडल्या.

"खरं आहे सफवान... आम्ही तर तोंड दाखविण्यास लायक राहिलो नाही." वहाबचा पुत्र अंधारात डोळे वटारुन सांगत होता.

"वडिलांच्या हत्येने तर जीवन नीरस झाले आहे." सफवानने आर्त स्वरात म्हटले.

"मृत्यु झालेल्यांचे कालांतराने सांत्वन होते, पण जीवित व्यक्तींचा विरह सहन होत नाही. अरे माझ्या पुत्रा!"

"मुस्लिम कैद्यांना चांगली वर्तणूक देतात असे ऐकले आहे. सफवानने मित्राचे सांत्वन केले.

"माझ्यावर कर्जाचे ओझे नसते तर," उमैर (रजि.) बोलत होता, "व मुलाबाळांची जबाबदारी नसती तर....."

"तर....उमैर (रजि.) तू काय केले असते?" सफवानने मध्येच प्रश्न केला. "मी....." उमैर (रजि.) ने सफवानला न्याहाळत उत्तर दिले, "मी आताच मदीना येथे जाऊन मुहम्मद (स.) यांचा वध करुन बद्रच्या युद्धात वीरगती प्राप्त झालेल्यांचा सूड घेतला असता."

हे ऐकून सफवानच्या डोळ्यांत चमक निर्माण झाली. त्याने उमैर (रजि.)चे दोन्ही खांदे हलवीत म्हटले, "अगदी खरे बोललास.... उमैर!"

"मला कधी खोटे बोलताना ऐकलेस का?" उमैर (रजि.)ने सफवानच्या डोळ्यांकडे पाहून प्रश्न केला.

"उमैर (रजि.)....! सफवानने अगदी संथ आवाजात म्हटले, "तू निश्चिंत राहा.... मी तुझे सर्व कर्ज फेडून टाकीन."

"सफवान....!!" उमैर (रजि.)च्या मुखातून अचानक शब्द उमटले.

"होय उमैर (रजि.).... मी संपूर्ण कर्ज फेडून टाकीन." सफवानने खात्री करून दिली.

"इतकेच नव्हे.... तुमचा जर वध झाला तर तुमच्या मुलाबाळांना उपाशी राहू देणार नाही."

उमैर (रजि.)च्या डोळ्यांत अचानक चमक निर्माण झाली. त्याने मदीनेकडे नजर फिरवली. तो शून्यात पाहू लागला. त्याच्या चेहऱ्यावरील हावभावाने त्याच्या भावनांच्या उलथापालथीची कल्पना येत होती.

विचार करता करता तो अचानक दचकला व इथे तिथे पाहू लागला, जणू त्याचा मुलगा त्याला हाक देत आहे. तो पुन्हा सफवानकडे वळला, "साफवान.... खरोखर आपल्या वचनांचे पालन करशील ना ?"

"उमैर (रजि.)....! सूर्य पूर्वेऐवजी पश्चिमेकडून उगवेल मात्र.... सफवान आपले वचनभंग करणार नाही." सफवानने आत्मविश्वासाने उत्तर दिले.

उमैर (रजि.)च्या डोळ्यांत पुन्हा चमक निर्माण झाली. तलवारीच्या मुठीवरची पकड अधिकच घट्ट झाली.

"मला खात्री आहे." उमैर (रजि.)ने सफवानला म्हटले, "पण सफवान...."

"आता पण-वण कशासाठी?" सफवानने उमैर (रजि.)ला मध्येच थांबविले,

"एक गोष्ट लक्षात ठेव." उमैर (रजि.)ने सफवानच्या शब्दाकडे दुर्लक्ष करून म्हटले.

"ती कोणती?" सफवान उमैर (रजि.)च्या अधिक जवळ झाला.

"जोवर निर्णय हाती येत नाही. ही बाब आम्हा दोघांतच राहिली पाहिजे." उमैर (रजि.) याने सफवानच्या डोळ्यांत डोळा घालून अत्यंत रहस्यमयपणे सांगितली,

"मी जीवन व मृत्युच्या बाबतीत चांगलाच अनुभवी आहे." सफवानने शांतपणे उत्तर दिले.

(२)

वहाबपुत्र उमैर (रजि.) याने वेळ न घालविता प्रवासाची तयारी केली. सर्वप्रथम त्याने तलवारीला धार दिली व तिला विषारी पाण्याचा थर दिला. थोडेफार सामान घेतले व एका वेगवान उंटावर स्वार होऊन मदीनेच्या दिशेला धांव घेतली. उमैर (रजि.) भरधाव प्रवास करीत होता. रस्त्यात तो कुठेच थांबला नाही. त्याला मदीना शहर गाठायचे

होते. सूडाच्या भावनेने तो प्रेरित झाला होता. तो पुन्हा पुन्हा आपल्या तीक्ष्ण धारेच्या तलवारीकडे नजर टाकत होता व मनातल्या मनात खूश होत होता. त्याच्या डोळ्यांत चमक निर्माण होत होती व ओठावर हास्य खेळत होते. त्याच्या मनात विचार येत होते की....

"तलवारीच्या एका फटक्यात काम फत्ते होईल. तलवार चांगलीच धारदार आहे त्यात तिला विष पाजले आहे. तलवारीची जराशी जखमही यमदसनी पाठविण्यास पुरेशी आहे."

असे विचार मनात घोळत होते व त्याच्या उंटाचा वेग तो वाढवीत होता.

(३)

उमैर (रजि.) मस्जिदे नबवी समोर उंटावरुन उतरला तोच माननीय उमर (रजि.) यांचे दर्शन झाले. माननीय उमर (रजि.) यांनी उमैर (रजि.) कडे पाहताच ताडले की त्याचा येण्याचा उद्देश चांगला नाही. ते आत गेले व त्यांनी पैगंबर (स.) यांना संपूर्ण परिस्थितीची जाणीव करून दिली.

"उमैर (रजि.)ला तुमच्या सोबत आत घेऊन या." पैगंबर (स.) यांनी माननीय उमर (रजि.) यांना सांगितले.

माननीय उमर (रजि.) उमैर (रजि.)ला आत घेऊन आले व पैगंबरांसमोर उभे केले. अल्लाह ने पैगंबर (स.) यांना वास्तविक परिस्थितीची अगोदरच जाणीव करून दिली होती. पैगंबर (स.) यांनी हसतमुखाने म्हटले....

"उमैर (रजि.), कसे येणे झाले?"

"मुलाची खैरखबर जाणून घेण्यासाठी आलो आहे?" उमैर (रजि.)ने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.

"ही तलवार कशाला आणली आहे?" पैगंबर (स.) यांनी तलवारीकडे इशारा करुन विचारले.

"ही बेकार आहे?" उमैर (रजि.)ने बेदरकारपणे उत्तर दिले. "आमच्या तलवारींनी बद्रच्या मैदानात तुमचे काय बिघडविले....."

बद्रच्या युद्धाची आठवण येताच त्याच्या मनात दबलेली घृणा पुन्हा जागी झाली. त्याचे ओठ थरथरु लागले. तो जास्त बोलू शकला नाही.

"उमैर (रजि.), खरं काय ते सांग, कोणत्या उद्देशाने आला आहेस." पैगंबर मुहम्मद (स.) यांनी धैर्याने प्रश्न विचारला.

"माझ्या मुलाला भेटायला आलो आहे." उमैर (रजि.) पुन्हा खोटे बोलला.

"तुम्ही व सफवान.... मक्केच्या बाहेर बसून काय बोलत होता?"

पैगंबर (स.) यांनी अगदी प्रेमाने सरळ प्रश्न मांडला.

उमैर (रजि.) या अनपेक्षित प्रश्नाने बावचळून गेला. तरीही आपले आश्चर्य लपवीत बोलला, "त्याचे असे झाले की...." त्याचा घसा कोरडा पडला व जीभ लडखडू लागली.

"सफवानने तुमचे सर्व कर्ज फेडण्याचे जे वचन दिले आहे ना? गरज भासल्यास तुमच्या संपूर्ण कुटुंबाला तो आधार देणार आहे ना?"

पैगंबर (स.) यांनी त्याचे सर्व गूढ उकलण्यास सुरुवात केली. उमैर (रजि.)ला चक्कर येऊ लागली. त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हते. पैगंबरांनी सांगितले, "विष पाजून तलवार आणली आहे मला जीवे मारण्यासाठीच ना?"

"पैगंबर मुहम्मद (स.) काही क्षण चूप राहिले नंतर बोलू लागले, परंतु उमैर (रजि.), हे विसरु नकोस की स्वत: अल्लाह माझा रक्षक आहे."

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वाणीत कणखरपणा होता. त्यामुळे उमैर (रजि.)च्या मनात कंपन निर्माण झाले. भींती व शरमेने त्याची नजर जमिनीत गाडली जात होती. पैगंबर (स.) यांच्या सतेज व पवित्र चेहऱ्याने प्रेषित्वाची आभा प्रकाशित होत होती. क्षणार्धात उमैर (रजि.) च्या संपूर्ण शरीरात एक प्रकारचे कंपन निर्माण झाले. त्याचे मस्तिष्क वेगवेगळ्या विचारानी भांबावून गेले.

"सफवानचे येथे येणे शक्य नाही. त्या रात्री अल्लाहशिवाय तिसरा कोणी नव्हता. मग ही सर्व हकीकत कशी कळाली ? निस्संदेह हे अल्लाहचे पैगंबर आहेत !"

उमैर (रजि.)च्या मस्तिष्कात असा विचार निर्माण होताच त्याचे हातपाय शक्तिहीन झाले. त्याचा स्वत:वर काबू राहिला नाही; तो पुढे झाला व पैगंबर (स.) यांचे पवित्र हात हातात घेऊन ढसढसा रडू लागला. तो म्हणत होता,

"हे अल्लाहचे पैगंबर (स.)! मला क्षमा करा व मला आपल्या छत्रछायेत राहू द्या".

माननीय उमैर (रजि.) यांच्या जिभेवर "कलम-ए-तौहीद" येऊ लागला. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सहकाऱ्यांना म्हटले, "ह्या आपल्या बांधवाला घेऊन जा. यांना कुरआन शिकवा व याच्या मुलाला मुक्त करुन टाका."

अनोळखी व्यक्ती

"हे माझ्या पालनकर्त्या! मी असाच तहानलेला मृत्यू पावेन का?" त्याने आपली कोरडी जीभ आपल्या कोरड्या व जाडजूड ओठांवर फिरवली व चोहीकडे नजर फिरवून म्हटले.

हब्शी जमातीचा एक जाडजूड युवक खैबरच्या हिरव्यागार घाटाच्या उताःरावर उभा होता. त्याच्या अवतीभोवती झाडे-झुडपे उगवली होती. त्याचे काळे काळे केस व फाटके कपडे धुळीने माखले होते. तो लांबचा प्रवास करून आला आहे असे दिसत होते. त्याचा चेहरा निस्तेज झाला होता. तो सारखा आपल्या घशावर हात फिरवीत होता व चोहीकडे नजरा फिरवीत होता. जणू तो काहीतरी शोधत आहे. अचानक त्याची नजर झाडीत पडलेल्या एका छोट्याशा पखालीवर पडली.

"पाणी.... पाणी!" असे म्हणत त्याने त्या पखालीवर झडप घातली. दुसऱ्या क्षणी पाण्याने भरलेली पखाल त्याच्या हातात होती. तो लगेच पखालीचे तोंड उघडून आपल्या कोरड्या घशावर त्यातील पाणी ओतू पाहत होता. अचानक त्याच्या मस्तिष्कात एका विचाराचा लखलखाट झाला. त्याने पखाल तोंडापासून दूर केली व पुन्हा इकडे तिकडे पाहू लागला.

(२)

थोड्याच अंतरावर एका मोठ्या झाडीत झोपेच्या गुंगीत असलेला एक दुसरा हब्शी हंजल (रजि.) झालेल्या खडखडाटाच्या आवाजाने जागा झाला. त्याने मान वर केली. त्याला सजातीय हातात पखाल घेऊन उभा असलेला दिसून आला.

"चोर!" असा त्याच्या मनात विचार आल्यामुळे चटकन तो उठून बसला.

तो झुडपांचा आडोसा घेत हळूहळू आपल्या शिकाराच्या दिशेकडे वळला. आता दोघांमध्ये केवळ एका झुडपाचे अंतर राहिले होते. हंजल (रजि.) एका उडीत दुसऱ्या हब्शीला पाठीमागून गचांडी धरू शकला असता, पण त्या व्यक्तीचा त्याला आवाज ऐकू आला. तो म्हणत होता,

"या पखालीच्या मालकाची भेट झाल्यास त्याची परवानगी घेऊन पखालीतील पाणी पिऊन कोरड्या घशास ओलावा देऊ शकेन."

हंजल (रजि.)चे हात-पाय गतिहीन झाले. तो पुढे जाऊ शकला नाही. तो त्याच झाडीत लपून राहिला. त्याचे मस्तिष्क मात्र विचाराने भारावून गेले.

"तो जर तहानलेला आहे तर पखालीतील पाणी का पीत नाही. त्याला पखालीच्या मालकाच्या परवानगीची काय गरज आहे."

"अद्याप कोणी दिसत नाही. हे अल्लाह मी काय करू."

त्या अनोळखी माणसाच्या तोंडून निघालेले हे शब्द, हंजल (रजि.)ला सारखे विचलित करीत होते. तो झुडपातून त्याच्याकडे टक लावून पाहत राहिला.

अनोळखी माणूस व्याकुळ होऊन इकडे तिकडे पाहत होता. अद्याप पखालीच्या मालकाचा तो शोध घेत होता. तो पुन्हा पुन्हा आपली कोरडी जीभ ओठांवर फिरवीत होता.

"तो असा का वागतोय? कोणत्या विचाराने त्याला पाणी पिऊ दिले नाही." हंजल (रजि.) पुन्हा विचारात मग्न झाला, "तो तहानेने कासावीस झाला आहे तरीही तो पाण्याच्या मालकाचा शोध करीत आहे. त्याच्या परवानगीशिवाय तो पाणी पिऊ शकत नाही, असे का?"

हंजल (रजि.) कुरुप व रंगाने काळा होता मात्र त्याचे मन काळे नव्हते. त्याचे मन स्वच्छ व तेजस्वी होते. परवानगी घेण्याचा विचार त्याला पटत नव्हता. त्या नवख्या माणसाबद्दल त्याच्या मनात सहानुभूती वाटू लागली होती. त्याच्या मनात आले की त्या व्यक्तीला पाणी पिण्याची परवानगी देऊन टाकावी. पण त्याने तसे केले नाही.

नवख्या माणसाने पखालीला पूर्ववत तिच्या जागेवर ठेवून दिले. तरीही त्याची नजर पखालीवर खिळून राहिली. त्याने बऱ्याच वेळा पखाल उचलण्यासाठी हात पुढे केला, परंतु नंतर हात मागे घेतला, जणू कुठलीतरी शक्ती त्याचे हात ओढून घेत होती. शेवटी त्याने आकाशाकडे नजर करून म्हटले,

"हे अल्लाह! तू साक्षीदार आहेस की मी खोटे काम केले नाही, कारण तुझ्या पैगंबरांने खोटारडेपणापासून दूर राहण्याची शिकवण दिली आहे."

हंजल (रजि.), नवख्या माणसाचे हे शब्द ऐकून दचकला. त्याने पाहिले की नवखा मनुष्य पाणी न पिता पुढे जात आहे; परंतु त्याचे पाय त्याला पुढे जाऊ देत नव्हते. काही पावले पुढे जाऊन तो चक्कर येऊन खाली कोसळला व बेशुद्ध झाला. हंजल (रजि.) झुडपांच्या मागे बाहेर आला. तो धावत गेला व पखाल उचलून त्या नवख्या व्यक्तीजवळ पोहचला.

(३)

नवखी व्यक्ती पुन्हा शुद्धीवर आली. हंजल (रजि.) व ती व्यक्ती दोघे एका वृक्षाच्या सावलीत बसून ताज्या ताज्या खजूर खात होते.

''हे घे! बघ किती रसदार आहे खजूर'' हंजल (रजि.)ने रसरशीत खजुरांकडे इशारा केला.

''धन्यवाद, नवख्या व्यक्तीने खजूर उचलली. तोंडात ठेवताच तो म्हणाला,

''खरोखर ही खजूर फार स्वादिष्ट आहे?''

''आता मला सांगा की तू कोण आहेस?'' हंजल (रजि.)ने जिज्ञासेपायी प्रश्न विचारला.

''मी कुरैशांचा एक निग्रो गुलाम आहे.'' अनोळखी व्यक्तीने खजूर तोंडात ठेवून उत्तर दिले.

''मग तुम्ही येथे कसे आलात?'' हंजल (रजि.)ने आश्चर्य प्रगट केले.

''माझ्या मालकाच्या अत्याचाराला कंटाळून पळून आलो.'' अनोळखी व्यक्तीने हंजल (रजि.)कडे बारकाईने पाहत उत्तर दिले, ''मक्का शहरातून दूर या वाळवंटात भटकतोय व लपून छपून भटकून इथे पोहचलो आहे.''

''आता कुठे जाण्याचा विचार आहे?''

''मदीनेला जाऊ इच्छितो.''

हंजल (रजि.) स्तब्ध झाला. तो विचाराधीन झाला. असे वाटत होते की त्या नवख्या व्यक्तीला आणखी काहीतरी विचारावे. पण खरी बाब विचारण्याचे त्याला धैर्य झाले नाही. पोटात दोन घास गेल्यानंतर नवख्या व्यक्तीला झोपेची गुंगी येऊ लागली.

''थोडा आराम करून घे, थकवा कमी झाल्यानंतर प्रवासाला निघ. हंजल (रजि.)ने नवख्या व्यक्तीला सांगितले.

अनोळखी माणूस तेथेच जमिनीवर आडवा झाला. थोड्या वेळाने उठून बसला व हंजल (रजि.) जवळ बसून बोलू लागला.

''बरंय.... मित्रा, आता मला आज्ञा दे, खूप वेळ झाली आहे.''

''एक गोष्ट विचारू, उत्तर देशील का?'' हंजल (रजि.)ने मनात दडलेली गोष्ट विचारायचे धाडस केले.

"विचार काय विचारायचे?" अनोळखी व्यक्तीने हसत हसत परवानगी दिली.

"त्या वेळी तू भलताच तहानलेला होता व पाण्याने भरलेली पखालही तुझ्या हातात होती. तरीही तू पाणी प्याला नाहीस, असे का केले?

"पाण्याचा मालक त्या ठिकाणी हजर नव्हता. त्याच्या परवानगीशिवाय पाणी पिणे बेईमानी झाली असती. म्हणून पाणी प्यालो नाही." अनोळखी इसमाने शांतपणे हंजल (रजि.)ला उत्तर दिले.

"तो कोण आहे ज्याने असे वागण्याची शिकवण दिली आहे ?"

"ते आमच्या जमातीचे बिलाल (रजि.) नावाच्या गुलामाचे मालक पैगंबर मुहम्मद (स.) आहेत. मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे ईमान स्वीकारले आहे." अनोळखी माणसाने उत्तर दिले. त्याच्या वाणीत आत्मीयता व आदर जाणवत होता.

"तूही ईमान स्वीकारले आहे काय?" हंजल (रजि.) आश्चर्यचकित होऊन अनोळखी माणसाकडे पाहत राहिला.

"होय, मीही ईमान स्वीकारले आहे." अनोळखी माणसाने अत्यंत विनम्रपणे सांगितले. "ते अल्लाहचे अंतिम पैगंबर आहेत. अल्लाहने त्यांच्यावर आपली वाणी (कुरआन) अवतरित केली आहे. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला आहे. ते आम्हाला वाईट वर्तन करण्यास मनाई करतात आणि प्रेम व आपुलकीची शिकवण देतात. मी त्यांच्याच भेटीला जात आहे."

हंजल (रजि.) आणखी काही विचारु पाहत होता. त्याच वेळी खैबरच्या किल्ल्याचे दार उघडले गेले व त्यातून यहूदी लोकांची सशस्त्र फौज बाहेर पडली. फौजेला पाहून अनोळखी व्यक्ती भयभीत झाली व जवळच्या एका पाण्याच्या नाल्यात उडी मारली व म्हणाला , "ठीक, मी जातोय.... भाग्यात असेल तर पुन्हा भेटू!"

(४)

दिवस महिन्यात व महिने वर्षात बदलत गेले. अनोळखी व्यक्तीशी भेटून हंजल (रजि.)च्या मनात चलबिचल होऊ लागली. ती कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत गेली. शेळ्या हाकण्याऐवजी तो झाडाखाली बसून तासनूतास विचार करु लागला.

"बिलाल (रजि.)चा मालक नक्कीच अत्यंत कृपाळू व्यक्ती असेल. विचारमग्न असताना अचानक त्याच्या जिभेवर असे शब्द उमटले. त्याचवेळी नजर एका शेळीवर

पडली जी कळपाला सोडून दूर जात होती. त्याने तिला हाका दिल्या. शेळी आपल्या कळपात परत सामील झाली व हंजल (रजि.) विचारात गुंग झाला.

"माझ्या मालकाने मला काय दिलय. त्याच्या मालकीच्या शेळ्या हाकण्यात माझ्या जीवनाचे कित्येक वर्ष निघून गेलेत. घृणा, अपमान व शिव्यांशिवाय मला काय मिळाले. माझे नाव बदलून हंजल (म्हणजे इंद्रायणीचे कडू फळ) ठेवण्यात आले आहे. हाही अपमान नाही का?"

हंजल (रजि.)ला आपल्या मालकाचा विचार करता करताच चेहऱ्यावर राग व चीड यांची संमिश्र भावना दिसू लागली. उलट मुहम्मद (स.) ना भेटण्याची इच्छा बळावली गेली. त्याला कुरैशच्या पळून गेलेल्या गुलामाची आठवण आली. तो किती श्रद्धा व आत्मीयतेने मदीनेकडे जात होता. असे वाटत होते, जणू एखादा तहानलेला व्यक्ति थंड पाण्याच्या स्त्रोताकडे जात आहे.

"मीही जाईन मुहम्मद (स.) यांच्याकडे."

हा विचार त्याच्या मनात येऊ लागला. तो गोंधळून इकडे तिकडे पाहू लागला.

दिवस संपत आला होता. आकाशात अंधार पसरत जात होता. हंजल (रजि.) शेळ्यांना किल्ल्याकडे हाकत नेऊ लागला.

(५)

एक दिवस हंजल (रजि.)ने हिरवळीजवळ झेंडे फडकताना पाहिले. नंतर यहूदी लोकांची एक सशस्त्र फौज त्याच्याकडे येताना दिसली. जवळून जात असलेल्या शिपायांपैकी एकाला विचारले, "आज शस्त्र का घेऊन जात आहात? सर्वकाही ठीकठाक आहे ना?"

"आम्ही त्या व्यक्तीशी लढण्याकरिता जात आहोत, जो स्वत:ला अल्लाहचा पैगंबर दर्शवितो." शिपायाने उत्तर दिले.

"मुहम्मद (स.) यांच्याशी युद्ध करायचा इशारा आहे काय?" हंजल (रजि.) सहज विचारले? "होय" म्हणत शिपाई पुढे निघून गेला.

क्षणार्धात घोड्याची गती वाढू लागली. धुळीमुळे ते दिसेनासे झाले. हंजल (रजि.) अपमानास्पदपणे त्यांच्याकडे बघून थुंकला व घृणास्पद स्वरांत म्हटले, "मुंग्यांना मृत्यु आला की त्यांना पंख फुटतात."

(६)

बरेच दिवस लोटले गेले. एके रात्री किल्ल्यात मदीनावाले हल्ला करणार आहेत अशी अफवा पसरली. मुहम्मद (स.) यांची सेना किल्ल्यासमोर उभी आहे. सर्वांना आश्चर्य वाटत होते की जवळ जवळ दोनशे मैल अंतरावरून सेना इतक्या लवकर कशी पोहचली कोणालाच जरासुद्धा कुणकुण ऐकू आली नाही. जेव्हा मुस्लिम डोक्यावर येऊन उभे राहिले तेव्हा त्यांना कळले. काही लोक गांगरून गेले. काही युद्धाच्या तयारीला लागले. हंजल (रजि.) अशी व्यक्ती होती की ज्याला आनंद होत होता. त्यांने रात्र कशी बशी घालवली. सकाळ होताच त्याने शेळ्यांना आवाज दिला. सर्व शेळ्या एका आवाजात एकत्र जमा झाल्या. त्याने पखाल आपल्या खांद्यावर अटकविली व हातात काठी घेऊन शेळ्या हांकत किल्ल्याबाहेर आला. रस्त्याजवळ पोहचून तो थबकला आजूबाजूला नजर फिरविली. सर्वत्र शांतता पसरली होती. परंतु आजची शांतता येणाऱ्या वादळाची चाहूल देत होती. हंजल (रजि.) याच्या हृदयाचे ठोके जोर जोरात वाजू लागले.

"मी तहानलो आहे व विहीर माझ्या जवळ येत आहे." हंजल (रजि.)ला आनंद विभोर झाला. आता मी तहानलेला राहणार नाही मी मुहम्मद (स.) यांच्याकडे जाईन, अवश्य जाईन. त्याने आपल्या शेळ्यांच्या कळपापलीकडे मदीनेकडून येणाऱ्या सेनेचे झेंडे दिसत होते. कळपामागे तो स्वत: चालत राहिला. आता तो एका टेकडीची लांबलचक चक्कर मारून खाली उतरत होता, अचानक त्याला अनोळखी व्यक्तीचे शब्द आठवले.

"हे अल्लाह, मी बेईमानी केली नाही, मालकाच्या परवानगीशिवाय पाणी प्यालो नाही."

हे विचार येताच त्याने शेळ्यांच्या कळपाकडे पाहिले. हे तर फार मोठे पाप आहे. मी मालकाच्या सर्व शेळ्या घेऊन चाललो आहे. त्याची पावलं थांबली त्याने मागे पलटून पाहिले.

"अरेच्या... मी तर खूप दूर निघून आलो आहे."

नंतर अचानक त्याच्या लक्षात आले, "जर मुहम्मद (स.) यांनी या शेळ्या परत केल्या तर मी समजेन की ते खरोखर अल्लाहचे पैगंबर आहेत व हे यहुदी खोटारडे आहेत, मात्र त्यांनी शेळ्या परत केल्या नाही तर यहुदी खरे ठरतील व मी परत येईन."

हंजल (रजि.) पुन्हा पुढे जाऊ लागला. तो पुढे जात राहिला. तो मुस्लिम छावणीजवळ पोहचला. सर्वत्र अंधार पसरत होता. सैन्याचा चारी बाजूला पहारेकरी पहारा देत होते.

"तुम्ही कोण आहात? कुठे जात आहात. शेळ्यांना थांबवा!"

हंजल (रजि.) एका भालेधारी सैनिकाजवळ उभा होता.

"मी मुहम्मद (स.) यांना भेटू इच्छितो." हंजल (रजि.)ने बेधडक उत्तर दिले.

सशस्त्र पहारेकरी जवळ येऊन पोहचला होता. दोघांनी एकमेकांकडे निक्षून पाहिले. एकाने भाला फेकून दिला व दुसऱ्याने आलिंगनासाठी हात पसरले. एकाच वेळी दोघांनी उच्चारले, "अरे तुम्ही आहात!"

हंजल (रजि.) व अनोळखी इसम दोघांनी एकमेकांस आलिंगन दिले.

(७)

हंजल (रजि.)ची पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर नजर पडताच तो चकित झाला. त्याच्या समोर एक चेहरा दिसत होता ज्यात कोमलता, स्नेह, श्रेष्ठत्व गांभीर्य व आकर्षणाचे अस्तित्व जाणवत होते. त्याचे हृदय आपोआप पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे ओढले जात होते. येताना त्याने बरेचसे प्रश्न पाठ करून ठेवले होते. परंतु पैगंबरांनी समक्ष पाहून सर्व प्रश्नांचा विसर पडला. तरीही त्याने धैर्य करून विचारले,

"आपला संदेश काय आहे व आपण कोणत्या गोष्टींचा प्रचार करता आहात?"

"माझा संदेश इस्लाम आहे." पैगंबर मुहम्मद (स.) यांनी समजावून सांगितले, "माझा संदेश आहे की अल्लाहशिवाय दुसरा कोणीही उपासनेस पात्र नाही. आम्ही सर्व आदम (अ.) यांची संतान आहोत. आमच्यात तो सर्वात अधिक आदरास पात्र आहे जो सर्वांत अधिक अल्लाहचे भय बाळगतो."

"मी सर्व गोष्टी मान्य केल्या तर त्याच्या मोबदल्यात मला काय मिळेल?"

"जन्नत!"

"हे अल्लाहचे पैगंबर (स.)! माझ्याकडे या लोकांच्या शेळ्या आहेत, यांचे काय करू?"

"यांना (मुक्त कर!) अल्लाह त्यांच्या मालकाकडे पोहचवून देईल."

या उत्तराने काळाकुट्ट हंजल (रजि.) हर्षित झाला. त्याचे मन साक्ष देऊ लागले. "निस्संदेह मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आहेत आणि हे यहुदी खोटारडे आहेत."

त्याचे संपूर्ण शरीर अनामतीच्या ओझ्याने थरथर कापू लागले. हर्ष व आनंदाच्या विपुलतेने, अधिकतेने, श्रद्धेने ओतप्रोत होऊन त्याने कापऱ्या आवाजात इस्लाम स्वीकारल्याची घोषणा केली. "मी साक्ष देतो की अल्लाहशिवाय इतर कोणीच पूजनीय नाही व मी साक्ष देतो की मुहम्मद त्याचे सेवक व पैगंबर आहेत."

(८)

सकाळ होताच मुस्लिम व यहुदी लोकांत युद्ध सुरू झाले. दोन्ही फौजा एकमेकांवर आक्रमण करू लागल्या. तो काळपट गुलाम जो कुरुप होता, ज्याला यहुदी हंजल (रजि.) म्हणून हाक मारीत असत व ज्याच्या घामातून दुर्गंधी येत होती, मुस्लिमांबरोबर खांद्याला खांदा लावून यहुदीविरुद्ध लढत होता.

जेव्हा मुस्लिमांना विजय प्राप्त झाला व शहिदांचे मृतदेह तंबूत आणले जाऊ लागले, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) तंबूत आले. पैगंबर (स.) यांनी पाहताच क्षणी त्या निग्रोचा मृतदेह ओळखला, जो रक्ताने माखला होता व इतर मृतांबरोबर ठेवला गेला होता. तंबूतून बाहेर येऊन आपल्या सहकाऱ्यांना संबोधून पैगंबर (स.) म्हणाले, "अल्लाहने या गुलामाला स्वीकारले आहे व सदाचाराकडे वळविले आहे. याच्या डोक्याच्या दोन्ही बाजूस दोन सुंदर अप्सरा उभ्या आहेत. जरी या व्यक्तीने एकदाही नमाज पढली नाही."

हंजल (रजि.) यांना एकदाही नमाज अदा केली नव्हती. इस्लाम स्वीकारताच जिहाद सुरु झाला व ते त्यात सामील झाले व हुतात्मा झाले.

अल्लाह अशा पवित्र मनाने आचरण करणाऱ्यांवर आपल्या कृपांचा वर्षाव करो, ज्यांनी त्याने दिलेल्या मार्गावर आपले प्राण अर्पण केलेत व उदात्त बलिदानाची परंपरा कायम केली.

स्थलांतर

“या धर्महीन लोकांनी आम्हाला नामोहरम करून सोडले आहे.” कुरैश लोकांच्या बैठकीत एका सरदाराने विषयारंभ केला.

“आमचा अंदाज चुकीचा ठरला.” दुसऱ्याने मत प्रदर्शित केले, “आम्ही त्यांच्यावर जितके कठोरपणाने वागला व त्यांना मारहाण केली तितक्याच दृढतेने त्यांनी परिस्थितीचा मुकाबला केला.”

“असे वाटते ते मुहम्मद (स.) व त्यांच्या उपदेशांवर जीवापाड प्रेम करू लागले आहेत.”

तिसऱ्याने म्हटले, “म्हणूनच ते धनदौलत, घरदार व मिळकत सोडून संधी मिळताच यसरब (मदीना)ला निघून जातात.”

चौथ्याने परिस्थिती अधिक स्पष्ट केली,

“याचकरिता इथे विचारविनिमय करण्यासाठी व या लोकांची वाट लावण्यासाठी आपण येथे एकत्र झालो आहोत.”

एक म्हतारा, जो डोके खाली करून बसला होता व लोकांचे विचार ऐकत होता, लोकांकडे बघून बोलला, “मला तर एका मोठ्या भयंकर परिणामांची भीती वाटत आहे!”

“कसली भीती?” त्या म्हाताऱ्या सरदाराकडे पाहून सर्वांनी एकाच वेळी प्रश्न विचारला.

“हे सर्व धर्महीन लोक यसरब (मदीना) मध्ये एकत्र होत आहेत व तेथील लोकही त्यांना साथ देत आहेत.”

एका सरदाराने दुजोरा दिला, “होय हे खरे आहे.”

“या लोकांनी एकत्र होऊन आमच्यावर हल्ला केला तर काय कराल?”

“तुमची शंका खरी आहे.” बऱ्याच सरदारांनी सहमती दर्शविली.

“आमचा सीरियाकडे जाणारा मार्गही बंद होण्याची शक्यता आहे?” म्हाताऱ्या सरदाराने शंका उपस्थित केली.

“असे झाले तर आमच्या व्यापारावर दुष्परिणाम घडून येतील.” कोणीतरी भीती व्यक्त केली.

"असे झाले तर आमचे मोठे आर्थिक नुकसान होईल." आणखी कोणीतरी चिंता व्यक्त केली.

"म्हणूनच मी म्हणतो की मुहम्मद (स.) यांचा काटा कायमचा काढला पाहिजे, त्यांच्यामुळेच उपद्रव निर्माण झाले आहेत." शांत बसलेल्या अबू जहलने आपले मत प्रकट केले.

"हे तर खरे आहे, परंतु हे काम कसे करायचे, या समस्येवर सर्वांनी विचार करायला हवा?"

"या बाबतीत सर्वांनी आपापले मत प्रकट करावे." अबू जहलने उत्तर दिले.

"सर्वांना जर योग्य वाटले तर मुहम्मद (स.) यांचे हातपाय साखळीने बांधून एका खोलीत बंदिस्त करावे म्हणजे ते कवी जुहैर व नाविगासारखे मृत होतील." एका सरदाराने सूचना मांडली.

"नको असे काही करू नका." म्हातारा सरदार म्हणाला, "ही बाब लोकांपासून लपविता येणार नाही. माहीत होताच मुहम्मद (स.) यांचे सहकारी आमच्यावर तुटून पडतील व त्यांना मुक्त करून नेतील.

"माझ्या मते त्यांना धरून कुठल्यातरी दूर स्थळी सोडून द्यायला हवे." दुसऱ्या सरदाराने आपली सूचना मांडली.

"नाही, ही सूचनाही रास्त नाही." म्हाताऱ्या सरदाराने चटकन सूचना रद्द केली. "तो किती गोड व आकर्षक गोष्टी सांगतो हे विसरलात काय? तो जिथ जाईल तेथील लोकांची मर्जी संपादन करील. लोक त्याचे अनुयायी होतील. मग ते सर्व जण आपल्यावर हल्ला करतील व आपण आपली इभ्रत वाचवू शकणार नाही. तुमची सरदारकी ही संपुष्टात येईल."

थोडक्यात सांगायचे म्हणजे तेथे जमलेल्या लोकांपैकी सर्व जण आपले मत मांडीत होते. शेवटी अबू जहल, जो सर्व तमाशा बघत होता, बोलला, "जर तुम्हास मान्य असेल तर मी एक सूचना मांडेन, ती कदाचित सर्वांना योग्य वाटेल.'

"अवश्य मांडा अबुल हकम! (अबू जहल याची उपाधी.)" सर्वांनी सूचना मांडण्याकरिता विनंती केली.

अबू जहल उभा राहिला व उपस्थितांना पाहून बोलू लागला, "माझ्या मते, प्रत्येक

जमातीच्या एकेका सशक्त तरूणाची निवड करण्यात यावी. उद्या रात्री आपण सर्व मोहम्मद (स.) यांच्या घरास वेढा घालू. सकाळी जेव्हा ते बाहेर पडतील तेव्हा आम्ही सर्व आपल्या तलवारीने त्यांच्यावर वार करू व त्याचा खिमा करून टाकू.''

हे ऐकूण सर्व आनंदित झाले व म्हातारा सरदार खूश होऊन म्हणाला, ''अबूल हकम तुमची सूचना रास्त आहे.''

अबू जहलने आपल्या योजनेची संपूर्ण बारीकसारीक बाबी सर्वांसमक्ष मांडल्या, ''एकत्र येऊन हल्ला केल्याने बनू हाशिम कुळातील लोक सर्वांशी वैर घेऊ शकणार नाहीत. जास्तीतजास्त म्हणजे आम्हाला मृत्युचा बदला मृत्युने द्यावा लागेल.''

अबू जहलच्या सूचनेला सर्व उपस्थितीनी संमती दर्शविली व सर्व योजनेला पार पाडण्यास सज्ज झाले.

(२)

मक्केवाले वध करण्याची तयारी करत होते, त्याउलट ईशचमत्कार त्याच्या अकार्यक्षमतेवर व लाचारीवर हसत होता दुसऱ्या दिवशी दुपारनंतर अल्लाहकडून पैगंबर (स.) यांना मक्का येथील सरदाराच्या योजनेची कल्पना देण्यात आली व आज्ञाही मिळाली की मुहम्मद (स.) यांनी आज रात्री आपल्या बिछाण्यात झोपू नये, मक्का सोडून जावे.

आदरणीय जिब्रईल (अ.) यांच्या प्रस्थानानंतर ते लगेच अबू बकर सिद्दीक (रजि.) यांच्या घरी पोहचले. पैगंबर (स.) यांनी दाराची कडी हलविली. माननीय अबू बकर (रजि.) लगेच बाहेर आले व दुपारच्या वेळी पैगंबरांना त्यांच्या दारावर उभे पाहून चकित झाले व विचारले,

''काही विशेष गोष्ट आहे काय? आपण या घटकेला माझ्याकडे आलात?''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर न देता घरात प्रवेश केला. नंतर माननीय अबू बकर (रजि.) यांना गुप्तपणे सांगितले, ''लोकांना येथून जायला सांगा, काही बोलायचे आहे.''

''हे अल्लाहचे पैगंबरा! येथे माझ्या दोन मुलीशिवाय दुसरे कोणी नाही,'' अबू बकर (रजि.) यांनी उत्तर दिले.

''मला येथून स्थलांतर करण्याचा आदेश मिळाला आहे. आज रात्री मी रवाना

होईन.'' पैगंबर (स.) यांनी अगदी सौम्य आवाजात सांगितले.

"हे अल्लाहचे पैगंबर! माझे आई-वडील आपल्यावर कुर्बान जावोत. मला आपल्यासोबत येण्याचे भाग्य लाभेल का?'' अबू बकर (रजि.) यांनी याचना केली.

"हो! तुम्ही माझ्या सोबत निघाल.'' पैगंबर (स.) म्हणाले, हे ऐकताच अबू बकर (रजि.) यांच्या डोळ्यांतून भावावेशाने अश्रू वाहू लागले. त्यांनी म्हटले, "हे अल्लाहचे पैगंबर! मी प्रवासासाठी दोन उंट तयार ठेवले आहेत. दोन्ही उंट चार महिन्यांपासून बाभळाची पाने खात आहेत. या दोहोपैकी एक तुम्ही घेऊन टाका.''

अल्लाहचे पैगंबर (स.) कोणाचे उपकार स्वीकारत नसत. ते म्हणाले, "ठीक आहे, याची किंमत घ्यावी लागेल?''

"माझे आई-वडील आपल्यावर कुर्बान! मला किंमत नको आहे!'' अबू बकर (रजि.) यांनी आर्त स्वरात उत्तर दिले.

"मी किंमत दिल्याशिवाय घेणार नाही!'' पैगंबर यांनी निर्णयात्मक स्वरात म्हटले.

"आपण जे म्हणाल ते मला मान्य आहे!'' अबू बकर (रजि.) यांना विवश होऊन किंमत स्वीकारावी लागली.

या वार्तालापानंतर पैगंबर मुहम्मद (स.) परतले. माननीय अबू बकर (रजि.) प्रवासाचे सामान व शिदोरी तयार करण्याच्या कामास लागले. त्यानंतर त्यांनी आपला मुलगा अब्दुल्लाह व गुलाम आमिर बिन फुहैरा (रजि.) यांना प्रवासाबद्दल आवश्यक सूचना दिल्यात.

(३)

"अली (रजि.)! आज तुम्ही माझ्या बिछान्यावर झोपा.'' पैगंबर (स.) यांनी माननीय अली (रजि.) यांना प्रेमाने आदेश दिला.

"माझे आई-वडील आपल्यावर कुर्बान! हे अल्लाहचे पैगंबर (स.)! आपण कुठे प्रस्थान करणार आहोत?'' माननीय अली (रजि.) यांनी आश्चर्याने विचारले,

"मला स्थलांतर करण्याबाबत आदेश मिळाला आहे. मी आजच रात्री मदिना शहराकडे रवाना होईन.'' अल्लाहच्या पैगंबरांनी हलक्या आवाजात उत्तर दिले.

"मला सोबत येण्याचे सौभाग्य प्राप्त होईल काय?" माननीय अली (रजि.) यांनी उत्सुकतापूर्ण स्वरात विचारले.

"तुम्हाला माहीत आहे की कुरैश लोकांच्या बऱ्याचशा अनामती माझ्याकडे पडल्या आहेत." पैगंबर (स.) यांनी हळूवारपणे समजावून सांगितले, त्या परत करणे आवश्यक आहे व हे काम तुमच्याशिवाय दुसरा कोणी करू शकणार नाही. हे काम प्रथम करणे आवश्यक आहे. हे काम पुरे केल्यानंतर अनुकूल परिस्थिती निर्माण होताच तुम्हीही येऊ शकता."

"आपण जसे म्हणाल तसे मी करीन." अली (रजि.) यांनी आज्ञा सहर्ष स्वीकारली.

"मी निघून गेल्यानंतर कोणीही मला विश्वासघातकी व बेईमान म्हणायला नको." पैगंबर (स.) यांनी माननीय अली (रजि.) यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हटले, "या अनामती परत केल्यावर माझ्यावर आरोप करण्याची कोणासही संधी मिळणार नाही."

"हे पैगंबर (स.) अल्लाहची इच्छा असेल तर असेच होईल." माननीय अली (रजि.) यांनी जबाबदारीच्या जाणिवेने उत्तर दिले.

"हे असे समजा की माझी हत्या करण्यासाठी कुरैश घराला वेढा देतील." पैगंबर (स.) यांनी रहस्य उघड करण्यासाठी सौम्य स्वरांत म्हटले, "मात्र तुम्ही जरासुद्धा भीती बाळगू नका, अल्लाह तुमचे रक्षण करील. माझी चादर अंगावर पांघरून बिनधास्त झोपी जा थोडी रात्र झाल्यानंतर अल्लाह मला येथून घेऊन जाईल."

नंतर तसेच झाले. जेव्हा रात्र झाली तेव्हा वेढा टाकणारे बेशुद्ध झोपले गेले. त्यांना झोपेत पाहून पैगंबर हळूच बाहेर पडले. चारी बाजूला शुकशुकाट पसरला होता. संपूर्ण मक्का अंधकाराच्या आवरणात झाकले गेले होते. पैगंबर (स.) यांची नजर काबागृहावर पडली. डोळ्यांत अश्रू तरंगू लागले. पैगंबर (स.) यांनी संपूर्ण काबागृह शहराकडे न्याहाळून पाहिले व दुःखाने म्हटले, "हे मक्का! तू मला साऱ्या जगापेक्षा जास्त प्रिय आहेस, परंतु माझा नाइलाज आहे, तुझी लेकरे मला येथे राहू देत नाहीत."

पैगंबर (स.) याची पावले माननीय अबू बकर (रजि.) यांच्या घराकडे वळली. प्रवासाचा सोबती त्याची प्रतीक्षा करीत होता. थोडेसे सामान व सत्तू एका हातात घेऊन ते घराबाहेर पडले. त्या दोघांनी रात्रीच्या अंधकारात दक्षिणेकडे प्रवास सुरू केला. मक्केच्या तीन मैल अंतरावर सौर नावाचा डोंगर आहे. तेथे पोहचल्यानंतर प्रवाशाने पहिला पडाव

टाकला. रस्ता फारच खडकाळ होता. रात्रीच्या अंधारात बोचणाऱ्या, टोकदार दगडांवरून चालणे कठीण जात होते. ते कसे बसे त्यावर चढले व एका गुफेत प्रवेश केला. याच गुफेचा इतिहासात 'गार-ए-सौर' असा उल्लेख केला जातो.

(४)

सकाळ झाली. वेढा टाकणारे जागे झाले, त्यांना कोणाचीतरी प्रतीक्षा होती. बराच वेळ निघून गेला, पण घरातून कोणी बाहेर पडला नाही. तेव्हा एकाने भिंतीच्या छिद्रातून बाहेरून डोळे लावून खोलीत पाहिले.

"अरे हा बिछान्यातून उठणारा कोण आहे?" झाकून पाहणाऱ्याच्या तोंडून शब्द उमटले.

"हे तर मुहम्मद (स.) नाहीत," दुसरा कुरैश ओरडला.

"हा तर अबू तालिबचा पुत्र अली (रजि.) आहे." तिसरा म्हणाला!

"मुहम्मद (स.) कोठे गायब झालेत?" बरेच जणांनी प्रश्न उच्चारला.

सर्वच जण बावचळले गेले. कोणाच्याच लक्षात आले नाही की प्रत्यक्षात काय घडले. "हा अली (रजि.) मुहम्मद (स.) यांच्या बिछान्यात का झोपला व मुहम्मद (स.) कुठे गेलेत?" त्याने दात चावत विचारले, "हा निश्चितच काहीतरी डाव आहे."

रागाच्या भरात सर्व मारेकरी घरात शिरले व अली (रजि.) यांना ओढून धरले व विचारले, "तुझा जोडीदार कोठे आहे?"

"मला काय ठाऊक, मी तर झोपलो होतो." अली (रजि.) यांनी बिनधास्तपणे उत्तर दिले, "तुम्ही तर पहारा देत होता, तुम्हाला माहीत असेल!"

या उलट उत्तराने वेढा घालणाऱ्यांना दचका बसला. रागाच्या भरात ते माननीय अली (रजि.) यांच्यावर तुटून पडले. त्यांनी त्यांना ठोसे व लाथा मारल्या. त्यांना ओढून काबागृहाकडे नेले व तेथेच कोंडून ठेवले नंतर काहीतरी विचार करून त्यांना सोडून दिले. लोकांनी मुहम्मद (स.) याचा शोध सुरु केला. अबू जहल काही जोडीदारांना घेऊन अबू बकर (रजि.) यांच्या घरी पोहचला. दाराची कडी हलवली. माननीय अस्मा (रजि.) बाहेर आल्या. वैऱ्यांनी विचारले, "तुमचे वडील कुठे गेलेत?"

"मला काय माहीत कुठे गेलेत ते?" यांनी अस्मा (रजि.) यांनी न भिता उत्तर दिले. माननीय अली (रजि.) यांच्यासारखेच उत्तर मिळाल्यामुळे अबू जहलच्या लक्षात

आले की हे सर्व जण एक दुसऱ्याला साथ देत आहेत व हे सर्व पूर्वनियोजित षडयंत्र आहे. तो रागाने चिडला व त्याने माननीय अस्मा (रजि.) यांच्या गालावर इतक्या जोरात फटका मारला की कानातली रींग तुटून खाली पडली.

त्यांना आता विश्वास झाला की माननीय अबू बकर (रजि.) सुद्धा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबरोबर स्थलांतरीत झालेत. त्यांनी वेळ न घालवता शोध सुरु केला. त्यांनी जाहीर केले की मुहम्मद (स.) यांना पकडून आणणाऱ्यास शंभर उंट बक्षीस दिले जातील. पायवाट शोधणाऱ्यांना बोलावण्यात आले. ते पाऊलवाट पाहत पाहत गावाबाहेर निघून गेले व ते पायाच्या खुणेवरुन दक्षिण दिशेला सौर पर्वताकडे चालू लागले. कुरैश हैरान झाले की मदीनेचा मार्ग उत्तरेकडे आहे. मग ते दक्षिण दिशेकडे का निघालेत. पण कुरैश वाटाड्याच्या पाठीमागे दक्षिणेकडे जाऊ लागले. ते सौर पर्वतावर चढू लागले व ते सौर गुहेजवळ पोहचले. इथे पोहचल्यानंतर ते निराश झाले, कारण गृहेच्या पलीकडे पायाच्या खुणा दिसत नव्हत्या.

विवश होऊन ते डोंगरावर इतस्तत: पसरले गेले व पैगंबर मुहम्मद (स.) यांना शोधू लागले. त्यांच्या बोलण्याचा व पावल्यांच्या ध्वनीचा आवाज गुफेत ऐकू येत होता. माननीय अबू बकर (रजि.) स्तब्ध बसले होते व त्यांची नजर मुहम्मद (स.) यांच्यावर खिळली होती, जणू ते पैगंबर (स.) यांना आपल्या हृदयात लपवू पाहत होते. माननीय अबू बकर (रजि.) यांची मन:स्थिती पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या लक्षात आली. त्यांनी अबू बकर (रजि.) यांना धीर देत म्हटले, "घाबरु नका, अल्लाह आपल्या बरोबर आहे."

इतक्यात एक कुरैशी गुफेच्या तोंडाजवळ येऊन उभा राहिला. त्याचे पाय गुफेतून दिसत होते. माननीय अबू बकर (रजि.) यांच्या हृदयाचे ठोके जोरात वाजू लागले. कुरैश गुहेत वाकूनही न पाहता बाजूला निघून गेला.

"काय झाले? तू गुहेत वाकून का पाहिले नाही." त्याच्या सोबत्याने त्याला विचारले.

"गुहेच्या तोंडावर मुहम्मद (स.) यांच्या जन्मा अगोदरच कोळ्यांनी जाळे विणून ठेवले आहे." कुरैशने उत्तर दिले, "याशिवाय पारव्याने तोंडाजवळच अंडी दिली आहेत व वृक्षाच्या एका फांदीने गुहेचे तोंड विभागून टाकले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता त्याच्यात कोणीही प्रवेश केला नसावा असे वाटले."

ते पूर्णत: निराश व हताश झाले. मात्र शंभर उंटांच्या बक्षिसाने त्यांना शोध मोहीम चालू ठेवण्यास विवश करून ठेवले होते. पण शेवटी त्यांना निराश होऊन रिक्तहस्त परत जावे लागले.

(५)

रोज सायंकाळी अबू बकर (रजि.) यांचे पुत्र अब्दुल्ला (रजि.) गुहेत येऊन कुरैशाच्या दिनचर्येची बितंबातमी पोहचवीत होते. त्यांच्या सोबत त्यांची बहीण अस्मा (रजि.) देखील येत असे. ती अल्लाहच्या दोन्ही प्रिय पाहुण्यांसाठी जेवण घेऊन येत असे. थोडा अंधार झाल्यानंतर माननीय अबू बकर (रजि.) यांचे गुलाम आमीर बिन फुहैरा (रजि.) दोघांना शेळीचे दूध प्यायला देत. त्यानंतर अब्दुल्लाह व त्यांची बहीण अस्मा (रजि.) यांच्या पायाच्या खुणांवरुन ते परत येत जेणेकरुन तेथे कोणी आला होता हे लक्षात येत नसे. अशा प्रकारे दोन दिवस लोटले गेले. तिसऱ्या दिवशी सायंकाळी जेव्हा अब्दुल्लाह (रजि.) मागील दोन दिवसांप्रमाणे तेथे आले. तेव्हा त्यांनी बातमी दिली,

"आता लोकांमध्ये पूर्वीसारखी धावपळ दिसून येत नाही. ते तुमचा शोध करुन निराश झालेत."

"मग असे करा उद्या सायंकाळी दोन्ही उंट येथे घेऊन या आणि अब्दुल्लाह बिन अरकत (रजि.)लासुद्धा सोबत घेऊन ये. त्याच्याशी माझे बोलणे झाले आहे." माननीय अबू बकर सिद्दीक (रजि.) यांनी आपल्या पुत्राला समजावून सांगितले.

दुसऱ्या दिवशी योजनेप्रमाणे सर्व जण तेथे पोहचले. अल्लाहचे पैगंबर (स.) अबू बकर सिद्दीक (रजि.) यांच्या सोबत गुहेतून बाहेर पडले.

"हे अल्लाहच्या पैगंबरा !" माझे आई-वडील तुमच्यावर कुर्बान! या उंटावर तुम्ही स्वार व्हा" माननीय अबू बकर (रजि.) यांनी सर्वात चांगले उंट त्यांना देऊ केले

"मी त्याच उंटावर स्वार होईन. जे माझे आहे, पैगंबरा (स.) यांनी म्हटले,

"हे पैगंबरा ! हेच उंट तुमचे आहे." माननीय अबू बकर (रजि.) यांनी उत्तर दिले.

"यांची किंमत काय आहे ?"

माननीय अबू बकर (रजि.) यांनी जेव्हा किंमत सांगितली तेव्हा पैगंबर (रजि.) त्यावर स्वार झाले. पैगंबर (स.) यांच्या मागे माननीय अबू बकर (रजि.) बसले. दुसऱ्या

उंटावर अब्दुल्लाह बिन अरक्त (रजि.) व त्याच्या पाठीशी आमिर बिन फुहैरा (रजि.) स्वार झाले. अशा तऱ्हेने हा छोटा पण नशीबवान काफिला रात्रीच्या अंधारात आम रस्त्यापासून लांब समुद्राच्या तटाशेजारुन यसरबकडे रवाना झाला.

(६)

कुरैशच्या सरदारांची एक सभा बोलाविण्यात आली. सभेत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबाबत चर्चा होत होती. एक व्यक्ती अचानक उभी राहिली व बोलू लागली.

"मी तीन लोकांना समुद्र तटाजवळून जाताना पाहिले. मला विश्वास आहे की ते मुहम्मद (स.) व त्यांचे सहकारी होते."

हे ऐकताच सभेत खळबळ निर्माण झाली. प्रत्येक व्यक्तीच्या मनात शंभर उंटांचे बक्षीस मिळविण्याची इच्छा वळवळ करु लागली. या सभेत सुराका बिन जुअसुम (रजि.) पण सामील होता. तो फार बुध्दिमान व चतुर मनुष्य होता. त्याने लगेच विषयांतर केले.

"नाही, मी त्यांना ओळखतो, ते लोक मुहम्मद (स.) यांचे साथीदार नाहीत, ते तर कोणत्यातरी कामासाठी याच रस्त्याने गेले आहेत."

उपस्थित असलेले सर्व गोंधळून गेले. सुराका (रजि.) थोडा वेळ बसून राहिला, जेव्हा त्याला विश्वास झाला की सर्वांचे लक्ष त्या विषयापासून दूर झाले आहे तेव्हा तो उठला व त्याने आपल्या घरचा रस्ता धरला. घरी पोहचून त्याने आपल्या नोकरास आदेश दिला, "घोडा तयार कर व मक्का शहराच्या बाहेरील डोंगराजवळ पोहचून माझी प्रतीक्षा कर."

तो घाईघाईने हत्यारबंद झाला. सर्वांच्या नजरा चुकवून मक्का शहराच्या बाहेर पोहचला, जिथे त्याचा घोडा उभा होता. त्याने उडी मारली व घोड्यावर स्वार झाला. घोड्याची लगाम सैल केली व समुद्र तटाकडे जाणाऱ्या रस्त्यावर बेफाम गतीने धावायला लावले. अचानक घोड्याला ठेच लागली व सुराका (रजि.) खाली कोसळला. तो कपडे झटकत उभा राहिला व पुन्हा घोड्यावर स्वार झाला. घोडा पुन्हा बेफाम होऊन धावू लागला. मात्र सुराका (रजि.) चिंताग्रस्त झाला. अरबस्तानात घोड्याला ठेच लागणे फार मोठा अपशगुन मानला जातो. परत फिरण्याचा विचार मनात आला पण शंभर उंटांच्या बक्षीसाच्या लालसेने त्याला परत फिरु दिले नाही. तो पुढचा प्रवास करत राहिला.

अल्लाहचे पैगंबर व त्यांचे साथीदार निश्चिंतपणे प्रवास करत होते. आता सूर्य पश्चिमेकडे कलला होता. सावल्या फिकट व लांबत गेल्या. अचानक अबू बकर (रजि.)

यांनी मागे वळून पाहिले. त्यांना दूर एक सावली दिसली, जी जलदगतीने त्यांच्याकडे येत होती. त्यांचे ऊर धडधडू लागले. त्यांना पैगंबर (स.) यांना सांगितले, ''हे अल्लाहच्या पैगंबर (स.) ! कोणीतरी आपला पाठलाग करीत आहे. तो बघा. एक स्वार आपल्या दिशेने वेगाने येत आहे.''

''अबू बकर (रजि.) ! घाबरु नका, अल्लाह आपले रक्षण करणार आहे.'' पैगंबर (स.) यांना मोठ्या विश्वास व संयमाने उत्तर दिले.

सुराका (रजि.) चा घोडा जेव्हा जवळ आला तेव्हा तो स्पष्ट दिसत होता व घोड्याच्या टापांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. मात्र घोड्याने पुन्हा ठेच खाल्ली व त्याचे पाय गुडघ्यापर्यंत वाळूत अडकले. सुराका (रजि.) उल्टा होऊन जमिनीवर आपटला गेला व त्याचा चेहरा वाळूत फसला. आता तर सुराका (रजि.)ला विश्वास झाला की हे मुहम्मद (स.) यांच्या शापामुळे हे घडले आहे. त्याच्या लक्षात आले की अल्लाह आपल्या पैगंबरांची रक्षा करीत आहे. त्याने तेथूनच हाक मारली, ''मी मालिकचा मुलगा सुराका (रजि.) आहे. मला माहीत आहे की आपल्या शापामुळे माझ्या घोड्याचे पाय वाळूत रुतले गेलेत. मी माझ्या उद्देशाचा त्याग करतो, माझ्या घोड्यांचे पाय वाळूतून बाहेर निघावेत म्हणून दुआ करा.''

पैगंबर (स.) अत्यंत करुणामय व दयाळू होते. त्यांना सुराका (रजि.) वर दया आली व त्यांनी त्याच्याकरिता दुआ केली.

त्याचा घोडा मोठ्या आपत्तीतून मुक्त झाला. सुराका (रजि.)ने निवेदन केले, ''मी आपणाशी वार्तालाप करू इच्छितो.''

''त्याला विचारा की त्याला आमच्याकडून काय हवे आहे?'' अल्लाहचे पैगंबर (स.) यांना अबू बकर (रजि.) यांना म्हणाले.

माननीय अबू बकर (रजि.) यांनी मोठ्याा आवाजात म्हटले, ''तुला अल्लाहच्या पैगंबरास काय सांगायचे आहे?''

''मला पैगंबर (स.) यांनी क्षमा केली असे लिहून द्यावे.'' सुराका (रजि.) ने उत्तर दिले.

अल्लाहच्या पैगंबर (स.) यांनी आमिर बिन फुहैरा (रजि.) करवी चामड्याच्या एका तुकड्यावर क्षमादानाचा मजकूर लिहून सुराका (रजि.)ला प्रदान केले. मजकूर घेऊन

तो मक्केला परत गेला. त्याने झालेल्या घटनेचा उल्लेख केला नाही; उलट लोकांची दिशाभूल करीत राहिला. उद्देश असा की लोकांचे त्या विषयाकडे लक्षच जाऊ नये.

(७)

"हे विश्वाचे पालक, तूच त्यांचा रक्षक आहे. तुझ्या आदेशाप्रमाणे त्यांनी घरदार सोडले. आता तूच त्यांचा रक्षक आहे. तुझ्याशिवाय इतर देवी-देवतांच्या उपासनेपासून अलिप्त ठेवणे तुझ्याच हातात आहे. हे अल्लाह त्यांना सकुशल यसरिबला पोहचून दे." माननीय अली (रजि.) यांच्या प्रार्थनेत सर्वांचे डोळे अश्रूने भरलेले होते.

दुआ (प्रार्थना) केल्यानंतर त्यांनी डोळे पुसले व उपस्थितांवर नजर फिरवली. त्यांत बाहेरचा कोणीही सामील नाही याची खात्री करुन घेतली. मक्कावासी मुस्लिमांचे जीवन प्राणघातक झाले होते. मुहम्मद (स.) कोणतेही त्रास व कष्ट न भोगता सहीसलामत त्यांच्या कचाट्यातून मुक्त झाल्यामुळे कुरैश भडकले गेले. त्यांना त्यांचा पराजय झाल्यासारखे वाटले. जे थोडेफार मुस्लिम मक्केत शिल्लक राहिले होते ते कसेबसे दिवस कंठत होते. कुरैश प्रत्येकावर संशयाच्या दृष्टीने पाहत होते.

अल्लाहचे प्रेषित (स.) यांच्या आदेशानुसार, माननीय अली (रजि.) जेव्हा अनामती परत करायला जात तेव्हा त्यांना अनेक प्रश्न विचारले जात. ते उत्तर देण्याचे सहसा टाळण्याचा प्रयत्न करीत, त्यामुळे कुरैश त्यांच्याकडे घृणा व उपेक्षेच्या दृष्टीने पाहत.

माननीय अली (रजि.) सहसा कोणाशी वाद घालत नसत. शांतपणे सर्व गोष्टी ऐकून घेत. आदरणीय मुहम्मद (स.) यांच्यापासून दूर राहणे त्यांना असह्य होत होते व मक्केतील कुरैश लोकांचा क्रोध व घृणा त्यांना सहन होत नव्हती. पण त्याला इलाज नव्हता. अल्लाहचे पैगंबर (स.) यांच्या आज्ञेचे उल्लंघन करु शकत नव्हते. जीव गुदमरतोय तर गुदमरु द्या. कोणत्याही परिस्थितीत अल्लाहचे पैगंबर (स.) यांच्या नावावर कोणताच आरोप होता कामा नये. म्हणूनच ते ज्याची त्याची अमानत त्यांना पोहचवीत होते व त्यांच्या शिव्या-शाप सहन करीत राहिले.

(८)

तीन दिवसांच्या धावपळीनंतर माननीय अली (रजि.) जेव्हा या जबाबदारीतून मुक्त झाले तेव्हा त्यांना यसरब (मदीना) कडे रवाना होण्याची ओढ लागली. एके दिवशी ते मक्कावासियांना न कळविता यसरबकडे रवाना झाले. लोकांच्या लक्षात येऊ नये म्हणून ते उंट किंवा घोड्यावरही स्वार झाले नाही. ते पायीच प्रवास करीत राहिले. केवळ दर्शनाची ओढ व प्रवासाचे साहस त्यांच्यासोबत होते.

ते अहोरात्र पायी प्रवास करीत राहिले. त्यांनी रखरखीत मैदान व खडतर रस्त्यांची पर्वा केली नाही. डोक्यावर रखरखीत उन्हाची व पायाखालील तप्त दगडांची व वाळूची चिंता बाळगली नाही. प्रेम-वेड्यागत ते चालतच राहिले. तळपायाला फोड येऊ लागले, फुटू लागले, मात्र त्यांच्या हृदयातील खंबीर प्रेम निवळले नाही. उलट त्यांचा उत्साह अधिकाधिक वाढत गेला व उत्साहाच्या भरात त्यांची गती वाढत गेली.

अन्तत: कुबाच्या वरच्या बाजूची घरे दिसू लागली. तेथून यसरब (मदीना) केवळ तीन मैल अंतरावर होते. त्यांचा उत्साह पाहण्यायोग्य होता. उत्साहाच्या भरात ते लडखडत पुढे चालत राहिले. कुबा (गांवा) च्या लोकवस्तीत प्रवेश केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की आदरणीय मुहम्मद (स.) अजून तेथेच विश्राम करीत आहेत. ते धावतच त्यांच्याकडे पोहचले.

"अली.... तुम्ही आलात!" असे बोलून आदरणीय मुहम्मद (स.) यांनी त्यांना हृदयाशी कवटाळून घेतले. दोन हृदयांचे मिलन झाले व हृदयाची आतुरता शांत झाली.

(९)

कुबा गावात एका मशिदीची पायाभरणी केली गेली. काही दिवसांनंतर यसरिबकडे रवाना झाले. कुबापासून यसरिबपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा मुहम्मद (स.) यांचे चाहते रांग लावून उभे होते. रस्त्यात अंसार लोकांची घरे होती. अंसार जमातीचे प्रमुख म्हणत होते. "पैगंबर - हे घर - ही संपत्ती व आमचा प्राण तुम्हाला अर्पित आहे."

पैगंबर मुहम्मद (स.) विवशता प्रकट करीत व त्या लोकांसाठी अल्लाहकडे प्रार्थना करीत. जसजसे शहर (मदीना) जवळ येत होते, लोकांचा उत्साह वाढत जात होता. जेव्हा ते (स.) शहरात दाखल झाले तेव्हा प्रत्येक जण त्यांच्या घरात पैगंबरांनी

विश्राम करुन घर पवित्र करावे अशी इच्छा प्रदर्शित करीत होता. शेवटी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या उंटाची लगाम सैल करुन दिली. ''याला सोडून द्या. अल्लाहच्या आज्ञेनुसार उंट योग्य जागी थांबेल.''

उंट पैगंबर मुहम्मद (स.) यांना घेऊन यसरिबच्या गल्लीबोळात फिरत राहिले. त्यांच्या पाठोपाठ सहकाऱ्यांचा मोठा थवा येत होता व ते घोषणा देत होते, ''अल्लाह-हो - अकबर''! मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले. ''अल्लाहु अकबर''! अल्लाहचे प्रेषिताचे आगमन झाले.''

स्त्रिया आपापल्या घराच्या छतावर उभे राहून स्वागतगीत गात होत्या, ''पौर्णिमेच्या चंद्राचा उदय झाला.''

''यसरबच्या प्रवेशद्वारातून येणाऱ्या पैगंबरांचे आम्ही स्वागत करतो.''

प्रार्थना करणारे म्हणत होते - ''हे आगमनकर्ता, तुम्ही आमच्याकरिता असे संदेश घेऊन आलात, जे आम्ही स्वीकारलेच पाहिजे.''

लहान बालिका गात होत्या, ''आम्ही नज्जार वंशाच्या कन्या आहोत.''

''आदरणीय मुहम्मद (स.) किती चांगले शेजारी आहेत.'' पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुलींना विचारले, ''मी तुम्हाला आवडतो का?'' त्या मुलींनी उत्तर दिले, ''होय!''

आदरणीय मुहम्मद (स.) म्हणाले, ''मला पण तुम्ही आवडता.''

उंट एकसारखा पुढे जात होता. शेवटी ते अबू अय्यूब अन्सारी (रजि.) यांच्या घरासमोर उभे राहिले. माननीय अय्यूब (रजि.) आनंदविभोर झाले. इतर सहकाऱ्यांना त्यांच्याबद्दल हेवा वाटला. सर्व जण त्यांना ''मेजबान-ए-रसूल'' म्हणजे पैगंबरांचे स्वागत व सेवा करणारे'' असे संबोधू लागले.

पैगंबर (स.) तेथेच उंटावरुन खाली उतरले.

अशा प्रकारे ही पवित्र यात्रा संपली व सर्व यात्रेकरु इच्छित स्थळापर्यंत पोहचले. त्याच दिवसापासून त्या शहराला यसरिबऐवजी ''मदीन तुन्नबी'' अर्थात पैगंबरांचे शहर म्हणू लागले. आता त्या शहरास मदीना म्हटले जाते.

शेवटी शांतता प्राप्त झाली

काल ज्या टेकडीवरुन सत्याची घोषणा करण्यात आली होती, तिच्याच कुशीत अल्लाहचे पैगंबर (स.) यांना एकटे पाहून अबू जहल कट्टर शत्रू झाला. त्याची जीभ कात्रीप्रमाणे चालू असे. बडबड करता करता तो आता शिव्या देऊ लागला. आदरणीय मुहम्मद (स.) यांनी त्याच्या शिव्यांकडे दुर्लक्ष केले. त्याच्यासमोर पैगंबर (स.) यांच्या मान खाली करुन उभे राहिले. या मौनवृत्तीने आगीवर तेल ओतण्याचे काम केले. तो चिडून अधिकच भडकू लागला. रागाच्या भरात त्याने एक दगड उचलला व पैगंबर (स.) यांच्या दिशेने भिरकावला. दगड पैगंबर (स.) यांच्या डोक्यावर लागला व ते रक्तबंबाळ झाले. कोणा एका स्त्रीच्या किंकाळीचा आवाज ऐकू आला व वातावरणात विरुन गेला. अबू जहल बडबड करीत काबागृहाकडे निघून गेला. पैगंबर (स.) यांनी आपल्या तेजस्वी चेहऱ्यावरुन रक्त पुसले व अक्रमा (रजि.) च्या घराकडे रवाना झाले.

(२)

जुदआन तैमीचे पुत्र अब्दुल्लाह तैमीच्या दारात उभी असलेली त्यांची दासी हा तमाशा पाहत होती. अबू जहलने जेव्हा पैगंबर (स.) यांच्याकडे दगड भिरकावला, तेव्हा तिच्याच तोंडून किंकाळी निघाली होती. त्यांच्या कपाळातून वाहणारे रक्त पाहून ती क्रोधित झाली होती व तिला दु:खही झाले होते. पण ती काय करु शकत होती? अबू जहल कुरैश - सरदारांपैकी एक होता व ती एक दासी होती, जिचे समाजात कोणतेच स्थान नव्हते.

"अशा माणसापेक्षा तर जनावर चांगले जे विनाकारण कोणावर हल्ला करीत नाही." ती बडबड करु लागली, "जंगली.... जुलमी शत्रूने अल्लाहच्या पैगंबराला घायाळ करुन टाकले. अरेरे! किती रक्त वाहून गेले त्यांच्या (स.) डोक्यातून!"

ती विचारात मग्न होती. अबू कैसच्या पावलांचा आवाज तिला ऐकू आला. ती घाबरली. एक धडधाकट सशक्त व्यक्ती जलद गतीने पर्वतावरुन खाली येत होता. त्याच्या डोळयांतून एक प्रकारचे तेज व विशाल छातीतून सामर्थ्य झळकत होते. त्याच्या एका बाजूच्या बगलेत तलवार व दुसऱ्या बाजूस धनुष्यबाण लटकवलेले दिसत होते. दासीने पाहताक्षणी ओळखले की ते पैगंबर मुहम्मद (स.) यांचे चुलते अब्दुल मुत्तलिबचे पुत्र माननीय हमजा (रजि.) आहेत. ते शिकारीहून परत येत आहेत व रोजच्या

नियमानुसार घरी जाण्यापूर्वी काबागृहाची प्रदक्षिणा करायला जात आहेत.

''अबू अम्मारा (रजि.) यांना नक्कीच तक्रार करीन.'' दासीचा चेहरा लाल झाला. हमजा (रजि.) जवळ येताच तिने सांगितले.

''अबू अम्मारा (रजि.)! असं वाटतंय की आपली प्रतिष्ठा व स्वाभिमान संपुष्टात आला आहे.''

''काय बडबड करीत आहेस, जुदआनची दासी!'' माननीय हमजा (रजि.) थांबले.

''मी खरं आहे तेच बोलते. अबू अम्मारा!'' दासीच्या तोंडून वदलेल्या शब्दांना धार होती.

''सांगत का नाहीस! सत्य काय आहे ते!'' ते अग्निवर्षक नजरेने दासीकडे पाहत होते. त्यांच्या तीव्रतेने दासीच्या अंगात झुरझुरी निर्माण झाली. तरी तिने धैर्याने सांगितले,

''बनी मख्जूमच्या वंशाचे बादशाह, मुहम्मद (स.) यांना त्रास देत आहेत, पण आपण ते थांबविण्यासाठी काही करत नाही.''

''का, काय झाले?'' माननीय हमजा (रजि.) यांनी कडाडलेल्या स्वरात विचारले. ''आपणास शिकारीशिवाय दुसरे काही सुचत नाही. अहो, अबू जहलने आपल्या पुतण्या मुहम्मद (स.) यांच्याशी कसे वर्तन केले.'' दासी माननीय हमजा (रजि.) यांच्या स्वाभिमानास आणखी एकदा डिवचून बोलली.

''सत्य सरळ सरळ शब्दात का सांगत नाही?'' माननीय हमजा (रजि.) यांच्या आवाजात चीड जाणवत होती.

''आपले पुतणे आताच येथून जात होते. अचानक अबू जहल येथे आला. तो मुहम्मद (स.) यांना खूप बरं-वाईट बोलला, शिव्या दिल्या. एवढेच नव्हे तर दगड मारुन त्यांना घायाळही केले.'' दासीने संपूर्ण घटना सांगून टाकली.

''जे काही तू सांगत आहेस ते सर्व स्वतः पाहिले आहे काय?'' माननीय हमजा (रजि.) क्रोधित झाले.

''होय.... अबू जहलने जे काही केले आहे, ते मी स्वतः डोळ्यांनी पाहिले आहे.'' दासी श्वास घेण्याकरिता क्षणभर थांबली व म्हणाली, ''त्याने दिलेल्या सर्व शिव्या स्वतः आपल्या कानाने ऐकल्या आहेत.''

माननीय हमजा (रजि.) क्रोधाग्नीने भडकून गेले. त्यांचे लाल लाल डोळे बाहेर पडतील की काय असे वाटत होते. त्यांच्यासमोर हाशिम वंशाचा स्वाभिमान प्रश्नचिन्हाचे स्वरुप धारण करु लागला. त्यांची मूठ आवळू लागली. ते काबागृहाकडे रवाना झाले.

(३)

अबू जहल काबागृहाच्या अंगणात आपल्या साथीदारांबरोबर गप्पा मारीत होता. एवढ्यात अचानक माननीय हमजा (रजि.) धडधडत तेथे उपस्थित झाले. रागाच्या भरात त्यांनी आपला धनुष्य अबू जहलच्या डोक्यावर आपटला. अबू जहलच्या डोक्याला चीर पडली व चेहऱ्यावरुन भळाभळा रक्त वाहू लागले. माननीय हमजा (रजि.) ने क्रोधित होऊन त्याला म्हणाले, "तू माझ्या पुतण्यास शिव्या देतोस. तो तुझ्या बाबतीत काही बोलत नाही. तू त्याला त्रास देतो. तो तुला चांगल्या मार्गाकडे नेण्याचा प्रयत्न करत असतो."

माननीय हमजा (रजि.) यांचे व्यक्तिमत्व अतिशय प्रभावशाली होते. त्यांना क्रोधित झालेले पाहून सर्वांची बोलती बंद झाली. शेवटी स्वतः अबू जहलने तोंड उघडले,

"अबू अम्मारा (रजि.)! खर सांगायचे म्हणजे मुहम्मद (स.) आम्हाला बिनडोक म्हणतो. आमच्या देवांना वाईटसाईट बोलतो. पूर्वजांच्या मार्गाच्या विरुद्ध बोलतो. एवढेच नव्हे तर त्याने आमच्या गुलामांना व दासींना आमच्या विरुद्ध फितवले आहे."

"तुमच्यापेक्षा असा बेअक्कल व मूर्ख कोण असेल. तुम्ही दगडाची पूजा करता. लक्षात ठेवा आजपासून मी माझ्या पुतण्याने दाखविलेला धर्म स्वीकारणार आहे."

अति क्रोधित होऊन माननीय हमजा (रजि.) यांनी मनात जे आले ते बोलून टाकले.

"तुम्हीही धर्म त्यागला आहे?" काही लोकांनी ओरडून आश्चर्य व्यक्त केले.

"निश्चितपणे - जर तुम्ही खरे असाल तर माझा विरोध करुन दाखवा." माननीय हमजा (रजि.) यांच्या आवाजाचा प्रतिध्वनि काबागृहाच्या अंगणात गरजला.

सर्वत्र शांतता पसरली. माननीय हमजा (रजि.) यांना प्रत्युत्तर देण्याचे कोणाचेच धैर्य झाले नाही. त्यांनी आपले मत प्रगट केले व सरळ मुहम्मद (स.) यांच्यासमोर हजर झाले व आपल्या पुतण्यास उद्देशून गर्वाने सांगितले, "पुतण्या! आनंदात राहा! आज मी हिशामचा पुत्र उमर अर्थात अबू जहलचा बदला घेतला आहे."

अल्लाहचे पैगंबर (स.) यांनी संधी साधून माननीय हमजा (रजि.) यांच्या हृदयावर मानसिक आघात केला, "काका, तुम्ही केलेल्या कार्यवाहीने मी खूश झालो नाही. हो, पण तुम्ही स्वत: इस्लाम स्वीकारला तर मी खूश होईन."

अपेक्षेविरुद्ध उत्तर ऐकून माननीय हमजा (रजि.) चकित झाले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अचूक पावित्र्याने माननीय हमजा (रजि.) हतबल झाले. त्यांनी स्वत:च इस्लाम धर्म स्वीकारण्याबद्दल थोडयाच वेळापूर्वी सर्वांसमक्ष घोषणा केली होती. पण ती घोषणा रागाच्या भरात केली होती. आता अल्लाहच्या पैगंबर (स.) यांचे उत्तर ऐकून ते गोंधळले गेले. आता त्यांच्या मनात पेच निर्माण झाला. त्यांनी कोणताच प्रतिसाद न देता आपल्या घराचा मार्ग धरला.

(४)

माननीय हमजा (रजि.) यांनी ही रात्र मोठ्या बेचैन मन:स्थितीत घालवली. अज्ञानतेचा पक्षपात व इस्लाम यातील अंतर पैगंबर (स.) यांच्या संक्षिप्त उत्तराने त्यांच्यावर चांगल्या प्रकारे प्रगट झाला होता. सत्याचे अनुमोदन त्यांना आपल्याकडे आकर्षित करीत होते. पण वंशाचा गौरव व पूर्वजांची परंपरा सोडण्यास त्यांचे मन तयार होत नव्हते. ते विचित्र असमंजस मन:स्थितीत अडकले गेले होते. यातून योग्य निर्णय घेण्याकरिता ते अल्लाहकडे प्रार्थना करीत होते व सत्यावर स्थिर होण्याकरिता प्रेरणा प्राप्त करु पाहत होते. या द्विधा मन:स्थितीत रात्रीचा किती तरी भाग निघून गेला हे लक्षात आले नाही. शेवटी त्यांना कधी झोप लागली हे कळालेच नाही.

सकाळी जाग आली तेव्हा डोके दुखणे कमी झाल्यासारखे वाटले. मनातली चलबिचलही ओसरली होती. त्यांच्या मनात विश्वास व श्रद्धा जागृत झाली. ते सरळ अक्रमा (रजि.) च्या घरी रवाना झाले. तेथे काही सहकाऱ्यांसोबत पैगंबर मुहम्मद (स.) विराजमान होते. पैगंबर (स.) यांना माननीय हमजा (रजि.) यांच्या सतेज चेहऱ्याकडे पाहून अंदाज आला की त्यांना सत्याची जाणीव झाली आहे, म्हणून त्यांनी हास्यवदनाने विचारले, "काका काय काम काढले?" "पुतण्या! मला कलिमा शिकव व इस्लामची दीक्षा दे!" माननीय हमजा (रजि.) शांत उभे होते. माननीय हमजा (रजि.) यांच्या तोंडून हे वाक्य ऐकून सर्व उपस्थितांना मनस्वी आनंद झाला व सर्वांनी एकमुखाने घोषणा दिली "अल्लाहु अकबर!"

एक स्थान व तीन प्रवासी

हुदैबियाच्या करारनाम्यावर दोन्ही पक्षाच्या लोकांनी हस्ताक्षर केले होते व करारनाम्याच्या अटीवर अंमल सुरु झाले होते. सर्व मुस्लिमांना बरोबर घेऊन पैगंबर (स.) मदीनाला पोहचले होते. मक्कावासी आनंदित होते की त्यांची पिडा टळली. परंतु काही कुरैशी जे अनुभवी व दूरदर्शी होते, त्यांना हे शांत वातावरण येणाऱ्या वादळाचे लक्षण वाटत होते. यामुळे काही कुरैश नाराज व खिन्न दिसत होते.

ते एका वृक्षाच्या सावलीत बसून चिंताग्रस्त होऊन बसले होते. ते उदास मुद्रेत होते व हुदैबियाच्या कराराविरुद्ध पश्चात्ताप करीत होते. त्यापैकी एक होते खालिद बिन वलीद (रजि.) त्यांना हुदैबियाचा करार मुस्लिमांचा विजय वाटत होता. म्हणून जेव्हा हुदैबियाचा करार होत होता तेव्हा ते मक्का सोडून कुठेतरी निघून गेले होते. त्यांच्या स्वाभिमानाला मुस्लिमांच्या मक्का शहरात निर्धास्तपणे येणे-जाणे योग्य वाटत नव्हते. त्यांच्या नेत्रांनी दुरुन येणाऱ्या वादळाचा अंदाज करुन घेतला होता. ते खाली मान घालून पुढे येणाऱ्या वादळाचा अंदाज करु लागले. ते एक यशस्वी व अनुभवी सेनापती होते व त्यांना मागील तीन युद्धांचा अनुभव होता.

त्यांच्या डोळ्यांसमोर बद्रच्या मैदानाचे दृश्य दिसत होते. एका बाजूला एक हजार सशस्त्र सैनिक व दुसऱ्या बाजूस नि:शस्त्र निराधार तीनशे तेरा माणसांचा लहानसा गट, ज्याचा एका झटक्यासरखी सुपडा साफ झाला असता, पण प्रत्यक्षात काय घडले? संध्याकाळ होता होता अल्पसंख्यकांनी बहुसंख्यकांना पराजित केले. हे कसे घडले? मानवबुद्धी याचे गूढ समजू शकली नाही.

दुसऱ्या बाजूस उहुदची घाटी होती. त्यात मक्कावाल्यांनी वेढा घातला होता. त्यांचा प्रत्येक सैनिक सूड घेण्याच्या भावनेने पेटला होता. बद्रच्या लढाईत मृत झालेल्या व्यक्तीचे नातेवाईक सैन्यात सामील झाले होते. त्यांना खात्री होती की या युद्धात त्यांचाच विजय होईल. कारण त्यांचा प्रत्येक सैनिक "जिंकू किंवा मरू" असा निश्चय करुन आला. परंतु डाव पुन्हा पालटला. शेवटी त्यांना युद्धभूमी सोडावी लागली. खर म्हणजे खालिद बिन वलीद (रजि.) यांना एक युक्ती सुचली व योगायोगाने मुस्लिमांच्या हातून एक चूक घडली, ज्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागले. पण सरतेशेवटी त्यांचाच विजय झाला. खालिद बिन वलीद (रजि.) यांनी कुशी बदलली व शून्याकडे एक टक पाहत राहिले.

"आता तर एकही मुस्लिम उरणार नाही. त्यांची मूलेबाळेही मारली जातील." याच उद्देशाने संपूर्ण अरबने मदीनेवर आक्रमण केले होते. मदीनावासियांना तयारी करण्याची संधीही मिळाली नाही. संपूर्ण मदीना चोहोबाजूने घेरला गेला. दोन्ही सैंन्याच्या मध्यभागी एका खंदकचे अंतर शिल्लक राहिले होते. वेढा वाढला गेला. मदीनावासियांना चिंता वाटू लागली. त्यांच्या शत्रूसेनेमध्ये आनंद साजरा होऊ लागला. त्यात गद्दारानींही विरोधी सैन्याला मदत सुरु केली. काळ सर्व काही पाहत होता व हसत होता. क्षणार्धात आकाशात ढग पसरु लागले. चोहीकडे शांतता पसरली, जी वादळाची चाहूल देत होती. वातावरणाने भयंकर रुप धारण केले. अल्लाहच्या अवकृपेच्या अंधकाराने मक्कावाल्यांच्या सैन्याला वेढा घातला. अनेकेश्वरवाद्यांमध्ये भय निर्माण होऊ लागले. सोसाट्याच्या वाऱ्याने त्यांचे तंबू उडू लागले. सारी साहित्य-सामुग्री विखुरली गेली. सैन्य बिथरले गेले. ज्याला जी वाट मिळाली तो त्या मार्गाने पळू लागला.

खालिद बिन वलीद (रजि.) आपल्या दोन्ही हातांनी डोळे चोळू लागला. त्याच्या तोंडून सहजपणे शब्द उमटले,

"निश्चितच ईश्वरीय शक्ति त्यांची मदत करीत आहे." हुदेबियाचा करार व खालिद बिन वलीद (रजि.) यांची दूरदर्शिता, मक्कावासियांची उत्साहहीनता व त्यांचा पळपुटेपणा दिसत होता.

खलिद बिन वलीद (रजि.) यांच्या ओठांत पुन्हा कंपन निर्माण झाले.... "आदरणीय मुहम्मद (स.) व त्यांच्या सहकाऱ्यांशी लढणे मूर्खपणा ठरेल. निःसंदेह ते संपूर्ण अरब काबीज करतील."

(२)

खालिद बिन वलीद (रजि.) शांतपणे क्षितिजाकडे पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावरील हावभावाने त्यांच्या डोक्यांत निर्माण होणाऱ्या विचारांचे वादळ दृष्टिगोचर होत होते. एवढ्यात दुरून एक स्वार येताना दिसला. खालिद (रजि.) त्याच्या दिशेने पाहत राहिले. स्वार जवळ येऊन थांबला व आपल्या चेहऱ्यावरील घाम पुसू लागला.

"बरं झालं. तुमची भेट झाली. नाही तर तुम्हाला शोधणे कठीण झाले असते."

"काय झाले भाऊ?" खालिद (रजि.) यांनी उठता उठता विचारले.

"मी मदिनेहून येत आहे." तुमचे बंधू वलीद (रजि.) हे पत्र दिले आहे.

खालिद (रजि.) यांनी पत्र हातात घेतले. स्वार पुढे निघून गेला. खालिद (रजि.) यांनी मोठ्या आतुरतेने पत्र उघडले व वाचू लागले, "भाई खालिद!"

अल्लाहचे पैगंबर जेव्हा काबागृहाच्या दर्शना (उमरा) साठी मक्का येथे आले होते, तेव्हा मीही त्यांच्याबरोबर होतो. तेथे पोहचून पैगंबर (स.) यांनी तुमच्याबद्दल विचारले होते की "तुम्ही कुठे आहात?" मी तुम्हाला खूप शोधलो पण तुमची भेट झाली नाही. जेव्हा तुम्ही मला भेटला नाही असे कळविले, तेव्हा पैगंबर (स.) म्हणाले, की खालिदसारखा बुद्धिमान व जाणकार मनुष्याने आतापर्यंत इस्लाम का स्वीकारला नाही. यात शंका नाही की त्यांना इस्लामची सत्यता अजून लक्षात आली नसेल. त्यांच्या बुद्धिमत्ते व योग्यतेचा इस्लामला उपयोग झाला असता.

भाऊ! मी खरं सांगतो की इस्लामसारखा खरा व स्पष्ट कोणताच धर्म नाही व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासारखा गुणग्राहक व दयाळू मार्गदर्शक मिळणे कठीण आहे. मग तुम्ही त्यांच्या स्नेह व कृपेपासून किती दिवस वंचित राहणार आहात?

....तुमचा बंधू वलीद (रजि.)

वलीद (रजि.) च्या पत्राने आगीवर तेल ओतण्याचेच काम केले. खालिद (रजि.) च्या डोळ्यात चमक निर्माण झाली. मात्र दुसऱ्या क्षणी ते कुठल्या तरी विचारात गुंग झाले. इतक्यात त्यांचा मित्र सफवान जवळून जाताना दिसला तो मक्का शहरातील एका श्रीमंताचा मुलगा होता, "अबू सुलैमान! सर्व काही ठीक आहे तरी कुठल्या विचारात गुंग होते?" खालिद (रजि.) स्वत:चे नाव ऐकून दचकला. डोळे वर करुन पाहिले. तर सफवान जवळच उभा होता.

"सर्व ठीक ठाक कुठे आहे." खालिद (रजि.) यांनी आपल्या भावना नियंत्रित करुन उत्तर दिले, "झाले तरी काय.... एवढी चिंता का करतोय?"

"मी विचार करतोय संघर्षाच्या परिणामांचा?"

"कसला संघर्ष?"

"जो आमच्या व मुस्लिमांच्या दरम्यान होत आहे."

"चिंता का करतोस.... आमचाच विजय होईल." सफवानने गर्वाने उत्तर दिले.

"कसं काय?" खालिद (रजि.) यांनी सफवानकडे निक्षून पाहिले.

"युद्धाचा निर्णय अधिक सैन्य, शस्त्र व अस्त्राच्या विपुलतेवर अवलंबून असतो, व आम्ही मुस्लिमांपेक्षा सरस आहोत." सफवानने सांगितले.

"पण सफवान.... गत तीन युद्धांचा निर्णय या सिद्धान्ताच्या विरुद्ध झाला आहे." खालिद (रजि.) यांनी आपले मत स्पष्टपणे मांडले.

"तरीही यश कुरैशानाच प्राप्त होईल." सफवानने आग्रही भूमिकेने उत्तर दिले.

"परिस्थितीच्या प्रकाशात मला तर वेगळेच परिणाम दिसत आहेत." खालिद (रजि.) यांनी ठासून उत्तर दिले.

"अबू सुलैमान, मला वाटते तुम्ही निराश झालात व तुमचा उत्साह लयाला गेला आहे." सफवानने खालिद (रजि.) यांचे विचार खोडून काढण्याचे प्रयत्न केले.

"सत्य परिस्थितीकडे डोळेझांक करणे भित्रटपणाचे नव्हे तर पोचटपणाचे आहे, सफवान !" खालिद (रजि.) यांनी वीटेच्या प्रश्नास दगडाने उत्तर दिले.

"तू चुकल्या समान बोलत आहेस, अबू सुलैमान !"

"एकूण परिस्थितिने सिद्ध होते की मुस्लिमांना कुठली तरी परोक्षशक्ति मदत करीत आहे." खालिद (रजि.) यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला. "तू स्वत: जरा विचार कर.... मुस्लिम जेव्हा येथून गेले तेव्हा किती हलाखीच्या दशेत होते व आज ते मदीना शहरात थाटात जीवन जगत आहेत. परदेश तर त्यांना स्वदेशापेक्षा अधिक लाभदायक सिद्ध झाला आहे." खालिद (रजि.) बोलत होते व सफवान मान खाली घालून ऐकत होता.

"त्यांची शक्ती दिवसोंदिवस वाढत आहे व आम्ही धावपळीत गुंतलो आहोत. या घटनेतून तुम्ही काय निष्कर्ष काढला आहे?" सफवानने विचारले, "तेच, जे एक दूरदर्शी व्यक्ती काढू शकते."

"अर्थात?"

"तेच की मुस्लिम सफल होतील!"

"समजा असे घडले.... तर....?"

"माझ्या मते दूरदर्शिता आम्हाला म्हणतेय की आपण मदीना येथे जाऊन मुहम्मद (स.) यांची अधीनता स्वीकारायला हवी." "काय म्हणतोस?" सफवानने आश्चर्य व्यक्त केले, "ते कोणी परके नाहीत, आपलेच भाऊबंद आहेत. मला विश्वास आहे की ते

आपल्याशी सद्व्यवहार करतील.''

''परंतु आपला वंशिक व पारंपरिक गौरव या गोष्टीला कधीच मान्य करणार नाही'' सफवानने दृढतेने उत्तर दिले.

''तुमचा हा निर्णय बुद्धिमत्ता व सामंजस्याच्या विरुद्ध आहे'' खलिद (रजि.) यांनी सफवानला पुन्हा पेचात पकडले.

''काही झाले तरी सध्या मी तुमच्या प्रस्तावास होकार देऊ इच्छित नाही.'' सफवानने आपली दृढता कायम ठेवली.

''हा बुद्धिमत्ता व सामंजस्याचा निर्णय नाही, केवळ भावनात्मक हट्ट आहे. तुम्हाला जे समजायचे असेल ते समजा.''

असे म्हणत सफवान एका बाजूला निघून गेला.

(३)

''मी तुमच्या विचारांशी सहमत आहे.'' खालिद (रजि.) यांच्याशी उस्मान बिन तलह (रजि.) यांनी त्यांचे समर्थन केले व म्हटले, ''मी डोळ्यांनी उघड उघड पाहत आहे की मुहम्मद (स.) यांना अल्लाहची मदत प्राप्त आहे. इस्लामची सत्यता स्पष्टपणे दिसत आहे.''

''मग तुमचा काय विचार आहे?''

''या बाबतीत मी स्वत: तुमच्याशी चर्चा करणार होतो. पण तुमची इस्लामविरोधी कठोरता अडथळा निर्माण करीत होती.'' उस्मान (रजि.) यांनी आपले विचार स्पष्टपणे व्यक्त केले.

''मग आता काय विचार आहे?''

'' तुमचा अंतिम निर्णय काय आहे?''

''आम्ही इस्लाम स्वीकारायला हवा.'' खालिद (रजि.) यांनी निर्णयात्मक उत्तर दिले.

''खरं आहे खालिद (रजि.)'' उस्मान (रजि.) ने जवळ येऊन खालिद (रजि.) यांना अलिंगन दिले.

इथले वातावरण आपल्याला अनुकूल नाही. शक्य तितक्या लवकर या लोकांची

साथ सोडून द्यायला हवी.

"आपण उद्याच मदीनेकडे रवाना होऊ." उस्माना बिन तलह (रजि.) यांनी सहमती प्रगट केली.

दुसऱ्या दिवशी दोन्ही मित्र मदीनेकडे रवाना झाले.

(४)

दोन्ही मित्र एका गावात विश्रांतीसाठी थांबले. एका वृक्षाखाली बसण्याची व्यवस्था केली व तिथेच बसून विचारविनिमय करु लागले. इतक्यात एक वाटसरु त्यांच्याकडे येताना दिसला.

"हा कोण येत आहे?" खालिद (रजि.) यांनी त्या दिशेला पाहून म्हटले.

वाटसरु आणखी जवळ आला. त्यास पाहून उस्मान बिन तलहा (रजि.) चटकन बोलले, "हा तर अम्र बिन आस (रजि.) आहे."

"तो इकडे कुठे आलाय्?" खालिद (रजि.) यांनी आश्चर्य व्यक्त केले.

"तो तर हब्शाला निघून गेला होता."

वाटसरु एकदम जवळ आला होता. उस्मान (रजि.) यांनी त्याला पाहून म्हटले, "बघा, हा तर अम्र बिन आस (रजि.) आहे."

"अंधारात तू बरोबर ओळखलेस." खालिद (रजि.) म्हणाले.

वाटसरु त्यांच्याबरोबर उभा ठाकला. दोघांनी त्यांचे स्वागत केले.

"कुठून येत आहात?"

"हब्शाहून."

"कुठे जाण्याचा बेत आहे."

"मदीनेला."

"उत्तम, तुम्ही आम्ही एकत्र प्रवास करु."

"तुम्ही मदीना येथे का जात आहात?"

"आम्हाला सत्याची जाणीव झाली आहे." खालिद (रजि.) यांनी प्रेमपूर्वक जबाब दिला, "आम्ही इस्लाम स्वीकारणार आहोत."

"मीही त्याच हेतूने जात आहे." अम्र बिन आस (रजि.) यांनी आनंद व्यक्त

केला.

“सध्या तर येथेच आराम करा.” उस्मान बिन तलह (रजि.) ने म्हटले.

“सकाळी एकत्र मदीना येथे जाऊ.”

(५)

मस्जिद-ए-नबवीमध्ये पैगंबर मुहम्मद (स.) विराजमान होते. त्यांचे सहकारी त्यांच्यासोबत बसले होते. इस्लामबाबत चर्चा होत होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले.

“बघा....! मक्केने आपल्या प्रियजनांना आमच्याकडे पाठवून दिले आहे.”

नंतर पैगंबर (स.) यांनी त्या तिघांचे नाव सांगितले. ही शुभ बातमी ऐकूण सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सर्वात जास्त वलिद (रजि.) यांना आनंद झाला. वलिद (रजि.) त्यांचे स्वागत करण्यासाठी वस्ती बाहेर गेले होते. रस्त्यातच तिघांची भेट झाली. “लवकर चला!” अल्लाहचे पैगंबर (स.) यांना तुमच्या हेतुची कल्पना झाली आहे. वलिद (रजि.) यांनी आपल्या भावास बातमी दिली, “मुस्लिम तुमची प्रतीक्षा करीत आहेत.”

“आम्ही तर पैगंबर (स.) यांना कोणतीच सूचना दिली नव्हती,” खालिद (रजि.) ने आश्चर्याने म्हटले, “मग त्यांना कसे माहीत झाले ?”

“पैगंबर (स.) यांना त्यांचा पालनकर्ता गुप्त बातम्या देत असतो.” वलिद (रजि.) यांनी उत्तर दिले.

मस्जिद-ए-नबवी मध्ये तिघांचे आगमन होताच उपस्थित सहकाऱ्यांना हर्ष झाला.

“बोला खालिद (रजि.) कसे आलात ?” पैगंबर मुहम्मद (स.) स्नेहाने विचारले.

“आम्ही तिघे मुसलमान होण्याकरिता आलो आहोत.”

खालिद (रजि.) यांच्या तोंडून हे शब्द ऐकताच सर्व उपस्थितांना आनंद झाला व मस्जिदे-नबवी “अल्लाहु अकबर!”च्या घोषणांनी दणाणून गेली.

जादू नव्हे........!

"शुभागमन, स्वागतम.....! अहो शेख स्वागतम......!" मक्का शहरातील सरदाराच्या एका गटाने तुफैल बिन अम्र (रजि.) चे अभिनंदन करताना म्हटले, "आपल्या सारखी महान व्यक्ती आमच्याकडे आली याचे आम्हाला अभिमान वाटते." एक सरदार म्हणाला,

"आपण साक्षात चातुर्य व बुद्धिमत्ताचे रूप आहात" दुसऱ्या सरदाराने कौतुकाचा अतिरेक केला.

"काव्य व साहित्य तसेच विज्ञान व प्रतिष्ठा आपल्या मुळे अस्तित्वात आहेत" तीसऱ्या सरदाराने कौतुकाची कमाल केली.

दौस जातीचा समूह यमनच्या जवळपास अस्तित्वात होता. तुफैल (रजि.) त्याच जमातीचा सरदार होता. त्याच्या जमातीचे लोक त्याचा खूप आदर करीत असत. त्याला कौटुंबिक सम्मान, सामाजिक वर्चस्व व पद-प्रतिष्ठा परंपरेनुसार प्राप्त झाली होती. तो अत्यंत बुद्धिमान व चतुर होता. साहित्य व भाषेवर त्याला वर्चस्व प्राप्त होते. याच कारणामुळे यमन क्षेत्रात त्याला खुप आदर प्राप्त होते. इतर गटातील लोक ही त्याचा खुप आदर करीत असत.

तुफैल (रजि.) चे मक्का येथे आगमन होताच तेथील कुरैश सरदार लोकांना चिंता होऊ लागली. त्याची मुहम्मद (स.) यांच्याशी भेट झाल्यास अनर्थ घडुन येईल. त्यांना आशंका वाटत होती की जर त्यांचा मुहम्मद (स.) यांच्याशी संपर्क झाला तर तो मुस्लिम होईल व त्याची संपूर्ण जमात इस्लाम धर्म स्वीकारेल. म्हणुनच त्यांनी त्याचे स्वागत केले व त्यास खुश करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा त्यांनी खात्री झाली की तुफैल (रजि.) ची मर्जी संपादन झाली आहे तेव्हा त्यांनी मुद्दा त्याच्या समोर मांडला. एके दिवशी एका सरदार ने सांगितले, "श्रीमान! तुम्ही ऐकले असेल की येथे मुहम्मद (स.) नावाच्या व्यक्तीने जन्म घेतला आहे जो मोठा जादूगार आहे."

"तो कोणत्या वंशाचा व्यक्ती आहे?" तुफैल (रजि.)ने विचारले,

"त्याचा बनी हाशिमशी संबंध आहे व तो अबू तालिबचा पुतण्या आहे." त्याच सरदाराने उत्तर दिले,

त्याचा वंश तर फार आदरणीय आहे. तुफैल (रजि.) ने विचार मांडला.

"त्याच्यामुळे आमच्या समाजाची स्थिती गंभीर झाली आहे." पुन्हा त्याच सरदाराने चिंता व्यक्त केली.

“त्याच्या जादूमुळे बाप-लेक, भाऊ-भाऊ व पति-पत्नीमध्ये आकस निर्माण झालें आहे.” दुसऱ्या सरदाराने स्पष्टीकरण केले.

तो जादू करताना कोणत्या शब्दांचा उपयोग करतो.

“या गोष्टीचे आम्हाला ज्ञान नाही, पण त्यांच्या वाणीत असा काही प्रभाव आहे की ऐकणारे लगेच आकर्षित होतात.” दुसऱ्या सरदाराने उत्तर दिले.

आम्ही तर या जाळ्यात अडकलो आहोत पण तुमच्या जमातीचे लोक त्याच्या जादूच्या प्रभावात गुरफटले जाऊ नये असे आम्हाला वाटते. एका सरदाराने सहानुभूती व्यक्त केली. “म्हणुन आमचे नम्र निवेदन आहे की तुम्ही त्याच्याशी बोलू नका व त्याच्या जवळही जाऊ नका.”

तुफैल (रजि.) शांतपणे सर्व गोष्टी ऐकत होता. कुरैश यांच्या सहानुभूती व खोट्या निष्टेने तसेच स्वार्थी सत्काराने इतका प्रभावित झाला होता की त्यांच्या सूचना मान्य करण्यास तो विवश झाला. तो काबागृहात जाताना आपल्या कानात कापसाचे बोळे कोंबून घेत असे. जेणे करून मुहम्मद (स.) यांचे शब्द त्याला ऐकूच येणार नाहीत. काबागृहाची प्रदक्षिणा करतांना आपले डोळे मिटून घेत असे, जेणेकरून मुहम्मद (स.) यांचे दर्शन टाळता येईल व त्यांच्या जादू पासून तो सुरक्षित राहील.

(२)

बरेच दिवस असेच करीत राहिला. परंतु हृदय परिवर्तन करणाऱ्याचा वेगळाच निर्णय ठरला होता व तुफैल (रजि.) याच्या नशीबी जे सौभाग्य निश्चित झाले होते ते प्राप्त होण्याची वेळ येऊन ठेपली होती. एके दिवशी जेव्हा तो काबागृहाची प्रदक्षिणा करण्यासाठी आला तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काब्यात विराजमान होते व कुरआनचे पठण करीत होते. योगायोगाने त्याच्या कानातील कापसाचे बोळे सैल झाले व कुरआनच्या काही पंक्ती त्याच्या कानी पडल्या. त्याने डोळे उघडले त्याला मुहम्मद (स.) यांचे ओठ हलताना दिसले. ओठांच्या कंपनावरून कुरआनच्या पंक्तीचा अर्थ त्याला कळू लागला. जितका तो लक्ष देत होता तितकाच तो तल्लीन होत होता. शेवटी तो काबागृहातून बाहेर पडला पण त्याला काही केल्या चैन पडेना. त्याचे मन विचलित झाले. अशाच मनःस्थितीत तो विचार करू लागला.

“माझ्या पालनकर्त्याने मला बरे वाईट समजण्याची क्षमता प्रदान केली आहे मी मूर्ख नाही. मी काव्य व साहित्याचा जानकार आहे. मी अज्ञानी नाही. मग मुहम्मद (स.)

यांना भेटण्यापासून भय का बाळगतो?'' तो इथे तिथे पाहू लागला. चोहीकडे शांतता पसरली होती. ''आज मी जे काही अर्धवट ऐकले आहे ते फारच मधुर व प्रभावशाली होते. ती वाणी इतकी अलंकारिक व सोपी होती की यापूर्वी मी कधीच ऐकली नव्हती. अशा वाणीपासून मी वंचित राहिलो हे माझे दुर्भाग्य आहे.'' तो पुन्हा इकडे तिकडे पाहू लागला. पण तेथे कोणीच नव्हता.

''मी मुहम्मद (स.) यांना स्वत: का भेटू नये. त्यांच्याशी वार्तालाप का करू नये. यात काय नुकसान आहे त्यांचे कथन चांगले असेल तर ऐकेन व मान्य करीन. चुकीचे बोलत असतील तर ते अमान्य करीन.''

(३)

दुसऱ्या दिवशी जेव्हा तुफैल बिन अम्र (रजि.) यांच्या काबागृहात पोहचले तेव्हा मुहम्मद (स.) यांना नमाज पढताना दिसले. ईश प्रार्थनेत त्यांची तल्लीनता व चेहऱ्यावरील तेज पाहून ते आपले मन आवरू शकले नाही व स्वत: पैगंबरांकडे आकर्षित झाले. ते त्यांच्या जवळ पोहचले. पैगंबर (स.) यांच्या तोंडून जे शब्द उमटत होते ते मन लावून ऐकत राहिले व तल्लीन होत राहिले.

जेव्हा अल्लाहचे पैगंबर (स.) नमाज पूर्ण करून चालू लागले तेव्हा तुफैल (रजि.) सुद्धा त्याच्या मागे चालू लागले. त्यांनी पैगंबरांना साऱ्या घटना सांगून टाकल्या. कुरैश सरदारांच्या सूचना व सल्ला व प्रदक्षिणा करताना त्यांनी घेतलेली सावधानीचा तपशील दिला. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या घरी पोहचून त्यांनी आदरपूर्वक निवेदन केले. आता मी आपल्या मुखातून संदेश ऐकू इच्छितो.

''ठीक आहे - ऐका!'' पैगंबर (स.) यांनी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून म्हटले.

त्यांनी कुरआनाच्या काही ओळीचे पठण केले. ईशवाणी व ती ही पैगंबर मुहम्मद (स.) च्या पवित्र आवाजात ऐकून तुफैल (रजि.) च्या मनात ईशभय निर्माण झाले व हृदय पाझरू लागले. ते ऐकत होते तल्लीन होत होते व ढस ढसा रडत होते. अचानक बोलू लागले.

''हे अल्लाहच्या पैगंबरा!'' मला अज्ञानाच्या तिमीरातून त्वरित बाहेर काढा व कृपया सत्याच्या प्रकाशाकडे माझे मार्गदर्शन करा.''

अल्लाहचे पैगंबर (स.) याने एकेश्वरत्व (तौहीद)चा कलिमा त्यांना वदविला व इस्लामच्या कक्षेत दाखल करून घेतले.

(४)

मक्क्याहून माननीय तुफैल (रजि.) आपल्या घरी पोहचले व सर्वप्रथम आपल्या वडिलांना भेटले व म्हटले, ''आजपासून मी तुमचा नाही व तुम्ही माझे नाही.''

''का पुत्रा, असे का?'' म्हाताऱ्या वडिलानी विचारले.

''मी मुहम्मद (स.) चा धर्म स्वीकारला आहे.'' त्यांनी अत्यंत अभिमानाने शांतपणे उत्तर दिले.

''मुला! मला माहित आहे की तू सूज्ञ आहेस व तू जो निर्णय घेतला आहे तो विचारांति घेतला असणार. आता जो तुझा धर्म तो माझा धर्म'' वडिलांनी सहजपणे आपला विचार मांडला व इस्लाम स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

माननीय तुफैल (रजि.) आनंद विभोर झाले व आपल्या वडिलांना आलिंगन दिले. नंतर ते आपल्या पत्नीला भेटले व सांगू लागले.

''आजपासून तुझा व माझा पति-पत्नीचा संबंध समाप्त झाला.''

''असे कां? माझ्या हातून असा कोणता अपराध घडला आहे?''

त्यांच्या पत्नीने आर्त स्वरात विचारणा केली व डोक्यावर दोन्ही हात आपटले.

''मी पूर्वजांचा धर्म त्यागून मुहम्मद (स.) यांचा धर्म स्वीकारला आहे.'' माननीय तुफैल (रजि.) ने शांतपणे उत्तर दिले.

''मी तुमच्यापासून दूर कशी राहू शकेल? त्यांच्या पत्नीने आपल्या पतीवरील प्रेम व्यक्त केले.

अशा प्रकारे कुटुंबातील सर्वजनांनी इस्लाम धर्म स्वीकारला.

कृपेच्या छत्रछायेत

जेव्हा माननीय वहिया कलबी (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे पवित्र पत्र रोमच्या कैसर (बादशाह) हिरकल सादर केले तेव्हा त्याने पैगंबर (स.) यांच्याबद्दल बरेच प्रश्न विचारले. माननीय वहिया (रजि.) यांनी प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले. शेवटी हिरकलने आपल्या सरदारांना म्हटले, "अरबस्तानाचा एखादा व्यक्ती सापडल्यास त्याला उद्या दरबारात हजर करावे."

(२)

दरबारात लोकांची खूप गर्दी होती. हिरकल मोठ्या ऐटीत सिंहासनावर विराजमान होता. सिंहासनाच्या चारही बाजूस धार्मिक नेता एका रांगेत उभे होते. त्यांच्यासोबत अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे दूत वहिया कलबी (रजि.) सुद्धा उभे होते. इतक्यात अरबस्तानातील काही व्यापारी दरबारात आणले गेले. ते दरबाराच्या शिस्तीप्रमाणे प्रणाम करुन एका बाजूस उभे राहिले. त्यांच्यासोबत अबू सुफियान (रजि.) देखील हजर होता. त्याने अद्याप इस्लाम स्वीकारला नव्हता. उलट तो पैगंबर मुहम्मद (स.) यांचा कट्टर शत्रू होता. दरबारात शांतता पसरली होती. हिरकलने अरबस्तानातील व्यापाऱ्यांना संबोधून बोलला." तुमच्यापैकी पैगंबरांचा दावा करणाऱ्याचा कोणी नातेवाईक आहे काय?"

"मी आहे, महाराज" अबू सुफियान (रजि.) यांनी शाही शिष्टाचारानुसार उत्तर दिले.

"मी तुमच्या सरदाराला काही प्रश्न विचारु इच्छितो. हिरकल व्यापाऱ्यांकडे वळला. तो जर एखादे उत्तर चुकीचा देत असेल तर लगेच हरकत घ्या."

"अवश्य.... अवश्य." व्यापाऱ्यांनी एक मुखाने उत्तर दिले.

यानंतर हिरकलने अबू सुफियान (रजि.) यांना प्रश्न विचारला, "पैगंबरांच्या दावेदाराचे कुटुंब कसे आहे?"

"सभ्य व शुध्द रक्ताचे आहे." अबू सुफियान (रजि.) ने उत्तर दिले.

"खरं बोलताय." हिरकलने डोळे हालवून म्हटले, "अल्लाहचे पैगंबर (स.) याच प्रकारे आपल्या जमातीच्या सभ्य खानदानात पाठविले जातात."

"बरे, मला हे सांगा! याच्यापूर्वी कधी खानदानातील इतर कोणी पैगंबरांचा दावा केला होता काय?"

"मुळीच नाही."

"असे जर झाले असते तर मी मानले असते की ही वांशिक परंपरा आहे."

हिरकलने स्पष्टीकरण केले. "पैगंबरांच्या दाव्यापूर्वी त्यांच्यावर खोटे बोलण्याचा आरोप केला गेला होता काय?"

"कधी नाही." अबू सुफियान (रजि.) झटकन बोलले "तो तर आम्हा सर्वांपेक्षा जास्त सत्य बोलणारा आहे."

"जी व्यक्ती लोकांशी कधी खोटे बोलत नाही." रोमच्या शासकाने निर्णयात्मकरित्या म्हटले, "तो अल्लाहवर कसा आरोप करु शकतो." हिरकलचे हे उत्तर ऐकून अबू सुफियान (रजि.) चकित झाले. तो मान खाली घालून विचार करु लागला.

"बर, मला सांगा." हिरकलने पुन्हा प्रश्न विचारला "त्याच्या वडील व आजोबांपैकी कोणी राजा वा शासक झाला आहे काय?"

"नाही.... कोणीच झाला नाही." अबू सुफियान (रजि.) यांनी हलक्या आवाजात उत्तर दिले.

"जर असे झाले असते," हिरकलने म्हटले, "तर मी समजलो असतो की त्याला राजा व्हायची लालसा आहे."

रोमच्या राजाचे हे उत्तर ऐकून अबू सुफियान (रजि.) पुन्हा विचारांच्या सागरात बुडून गेले.

"ज्या लोकांनी नव्या धर्माचा स्वीकार केला आहे ते साधेभोळे आहेत की प्रभावशाली?" हिरकलचा पुढचा प्रश्न.

"कमकुवत लोक" अबू सुफियान (रजि.) यांच्या तोंडून सहज निघालेले शब्द.

"खरे आहे, पैगंबरांचे प्रथम अनुयायी गरीब लोक असतात."

"या उत्तराने अबू सुफियान (रजि.) यांच्या डोक्याला आणखी एक झटका लागला."

"हे तर सांगा.... त्याचे अनुयायी वाढतात आहे की कमी होत आहेत?"

"वाढत आहेत." अबू सुफियान (रजि.) यांनी उत्तर दिले.

"खरा धर्म होण्याची ही एक परख आहे की त्याचे अनुयायी वाढत जातात." या उत्तराने अबू सुफियान (रजि.) पुन्हा चकित झाले.

"त्याचा एखादा अनुयायी त्याच्या धर्मातून बाहेर पडला आहे ?"

"नाही... कधी नाही."

"ईमानची चव इतकी गोड असते की ती एकदा तोंडाला लागली की मग कधी सुटत नाही."

हिरकलने विचारले, "बर मला सांगा की तो वचन वा आश्वासनाचे उल्लंघन करतो का?

हिरकलच्या या प्रश्नाचा अबू सुफियान (रजि.) यांनी शत्रुतापूर्ण उत्तर दिले, "आतापर्यंत तर केलेले नाही, पण आता जो करार झाला आहे, बघा, त्यावर किती दिवस कायम राहतो."

"निस्संदेह, पैगंबर (स.) कधी वचनभंग करीत नाहीत." अबू सुफियान (रजि.) पुन्हा विचारात गर्क झाले. असं वाटत होते की त्यांचे मन शुद्ध होत आहे.

"तुम्ही त्याच्याशी कधी युद्ध केलंय?"

"होय बऱ्याच वेळा."

"काय परिणाम झाला?"

"कधी आम्ही जिंकलो तर कधी तो."

"पण.... सरतेशेवटी, पैगंबरच विजयी होतात." हिरकलने विचार करुन सांगितले, "मला सांगा की तो तुम्हाला काय सांगतो?"

हे महाराज! तो म्हणतो की अल्लाहची उपासना करा. इतर कोणाला त्याचा भागीदार करु नका. नमाज अदा करा, जकात द्या, आपल्या नात्यागोत्यातील लोकांशी चांगले व्यवहार करा, सत्य बोला, पवित्र जीवन जगा."

अबू सुफियान (रजि.) यांच्या आवाजात एक विशेष प्रभाव जाणवत होता.

"अबू सुफियान (रजि.)!" हिरकल म्हणाला, "जर तुम्ही प्रामाणिकपणे उत्तर दिले असेल तर तो दिवस दूर नाही, ज्या दिवशी या जागेचा तो मालक होईल. ज्या जागेवर मी बसलो आहे. किती बरे झाले असते जर मी त्यांच्या सेवेत उपस्थित राहिलो असतो व त्यांचे चरण धुतले असते."

यानंतर हिरकलने आदेश दिला की पैगंबर (स.) यांचे पत्र वाचण्यात यावे. पवित्र पत्र ऐकल्यानंतर अनेकांनी वाहवाह केली व सर्वत्र गोंगाट होऊ लागला. हिरकलला आपली सत्ता डगमगल्यासारखी वाटली. याकरिता त्याने मक्कावाल्यांना त्वरित विदा केले. अबू सुफियान (रजि.) मंद गतीने दरबाराच्या बाहेर निघाले. त्यांची मान खाली वाकली होती व कुठल्या तरी गहन विचारात मग्न होते.

दिवस निघून गेले. ऋतु बदलत राहिले. मात्र अबू सुफियान (रजि.) यांच्या मनाची व्याकुळता वाढत गेली. त्याच्या मन:पटलावर कितीतरी नव्या व जुन्या घटनांची चित्रे सतत येत जात राहिली. अल्लाहचे पैगंबर (स.) यांच्याशी केलेला दुर्व्यवहार व त्यांच्या उत्तरात पैगंबर (स.) यांनी केलेला सद्व्यवहार जेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर नाचू लागत तेव्हा ते अत्यंत विचलित होत असत. त्यांची मान लज्जेने खाली वाकली जात असे व विवश होऊन ते विचार करु लागत.

याच असंमजस परिस्थितीत त्यांच्या जीवनाचे दोन वर्ष निघून गेले. रमजानचा महिना हिजरी सन ०८ मध्ये मक्कावासियांनी करार भंग केला म्हणून मुस्लिमांच्या अफाट सेनेने त्यांच्यावर हल्ला केला. आक्रमण इतक्या शीघ्र गतीने आयोजित करण्यात आले की मुस्लिम त्यांच्या डोक्यावर पोहचल्यानंतर त्यांना हल्ला झाल्याची जाणीव झाली. मक्कावासी घाबरुन गेले. अबू सुफियान (रजि.) यांची मन:स्थिती विचित्र झाली. त्यांचे मन अशांत झाले होते. शेवटी ते विवश झाले व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे धाव घेतली. इस्लामच्या सेनेत पोहोचताच त्याना अटक करण्यात आली. त्यांना पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर उभे करण्यात आले. पैगंबर (स.) यांनी आपले मुख त्यांच्या विरुद्ध दिशेला फिरवले.

अल्लाहच्या पैगंबर (स.) यांचा हा व्यवहार पाहून अबू सुफियान (रजि.) दु:खी झाले. तेथेच उभी असलेली माननीय उम्मे सलमा (रजि.) हे दृश्य पाहत होती. त्यांनी अल्लाहचे पैगंबर (स.) यांना अबू सुफियान (रजि.) यांच्या बाबतीत सिफारस केली.

"अबू सुफियान (रजि.) यांच्या सख्या चुलत्यांचे पुत्र आहेत. त्याच्या अपराधांना क्षमा करा." परंतु या सिफारशीचा पैगंबर (स.) यांच्या कोणताच परिणाम झाला नाही. अबू सुफियान (रजि.) यांचो बेचैन वाढतच गेली. शेवटी माननीय अली (रजि.) यांना एक उपाय सुचला. त्यांनी अबू सुफियान (रजि.) यांना कुरआन पाकच्या ओळीची आठवण करुन दिली जी आदरणीय युसुफ (अ.) यांच्या बांधवांच्या तोंडून निघाली होती.... त्यांनी म्हटले होते,

"अल्लाहने तुम्हाला आमच्यावर श्रेष्ठत्व प्रदान केले आहे व खरे पाहता आम्ही अपराधी होतो." (दिव्य कुरआन १२:९१)

माननीय अली (रजि.) यांचा हा उपाय यशस्वी झाला. अबू सुफियान (रजि.) यांनी पैगंबर (स.) यांच्यासमोर उभे राहून त्या ओळी म्हणून दाखविल्या, लगेच पैगंबर (स.) यांनी तेच उत्तर दिले. जे आदरणीय युसुफ (अ.) यांनी आपल्या अपराधी भावांना दिले होते. अर्थात्

"आज तुमच्या विरुद्ध कोणताच आक्षेप नाही. अल्लाह तुम्हाला माफ करो. तो सर्वात मोठा दयावान आहे." (दिव्य कुरआन १२:९२)

अल्लाहच्या पैगंबरांच्या तोंडून जेव्हा या ओळी ऐकल्या तेव्हा ते आनंदविभोर झाले. अबू सूफियान (रजि.) यांच्या मुखातून 'कलिमा-ए-तैयबा' प्रवाहित होऊ लागला व विचित्र प्रेमातुर भावात म्हणू लागले,

"ज्या वेळी मी युद्धाची पताका या विचाराने हातात घेत होतो की लात (मूर्तीचे नाव) ची सेना मुहम्मद (स.) यांच्या सेनेला पराजित करील. त्या काळात मी अशा प्राण्यासारखा होतो, ज्याच्या अंगावर काटे असतात व जो रात्रभर इकडेतिकडे फिरत असतो. आता मला सुमार्ग मिळाला आहे व मी सरळ मार्ग अवलंबला आहे. मला अल्लाहचा रस्ता त्या व्यक्तीने दाखविला आहे ज्याची मी अपेक्षा केली व ज्याच्यापासून मी दूर राहिलो."

पैगंबर (स.) यांनी जेव्हा हे काव्य ऐकले तेव्हा म्हटले, "निश्चितच तुम्ही मला बरेच दिवस दुर्लक्षित केले." यानंतर पैगंबर (स.) यांनी अबू सुफियान (रजि.) यांच्याशी मोठ्या दयेने कृपाळू होऊन व्यवहार केला. त्यांनी मक्का विजयाच्या दिवशी घोषणा केली की, "जी व्यक्ती अबू सुफियान (रजि.) च्या घरात आश्रय घेईल त्याला अभयदान आहे."

एकटा हुतात्मा

"मी या घाणेरड्या वातावरणात जास्त दिवस राहू शकत नाही." अब्दुल उज्जा (रजि.) ने चारी बाजूस पाहून म्हटले. सर्वत्र शांतता पसरली होती. सूर्य आपल्या शक्तीनुसार प्रकाशमान होता. अब्दुल उज्जा (रजि.) घामाने तर्र होऊन उभे राहिले.

"चुलत्यांनी जर मुहम्मद (स.) यांचा धर्म स्वीकारला असता तर किती चांगले झाले असते!" अब्दुल उज्जा (रजि.) ने निराशाजनक स्वरात म्हटले.

काही दिवसांपूर्वी कोणाच्या तरी मार्फत इस्लाम धर्माचे आवाहन त्यांना प्राप्त झाले होते. ती त्यांच्या मनाची हाक सिद्ध झाली. आता तर ते मदीना जायला आतुर झाले होते. चारी बाजूला पसरलेले वातावरण जणू त्यांना काट्यासारखे बोचत होते. ते त्या वातावरणातून निघू इच्छित होते. परंतु चुलत्याचा सद्व्यवहार व उपकार त्यांच्या मार्गात अडसर निर्माण करीत होता. त्यांच्यासमोर तोंड उघडण्याची त्यांची हिम्मत होत नव्हती. ते आतल्या आत तडफडत होते. त्यामुळे त्यांच्या स्वास्थ्यावर वाईट परिणाम घडत होते. न कुठे येणे, न जाणे, कायमचे मौन बाळगणे.

त्यांची ही दशा पाहून शेवटी एके दिवशी चुलत्याने स्वत: विचारले, "पुतण्या! मी पाहतोय की काही दिवसांपासून तू चुकल्या चुकल्यासारखा वागतोय.... काय कारण आहे?"

"काका!" अब्दुल उज्जा (रजि.) यांनी वर पाहून उत्तर दिले, "तुम्ही माझ्यावर खूप उपकार केलेत. माझे पालनपोषण केले. मला उंट, शेळ्या व गुलाम दिलेत व...."

"आज तू हे सर्व वेड्यासारखा बोलतोय." अब्दुल उज्जा (रजि.)ला आलिंगण देत चुलते म्हणाले, "तू माझ्या भावाचा ठेवा आहेस. तुझे पालनपोषण करणे माझे कर्तव्य होते."

"तुम्ही माझ्यावर एक उपकार केले असते तर...." इतके बोलून अब्दुल उज्जा (रजि.) मौन झाले.

"बोल बोल काय हवंय तुला." चुलत्याने आतुरतेने विचारले.

"मला मदीनाला जायची परवानगी द्या."

अब्दुल उज्जा चुलत्याकडे पाहत होते. मदीनाचे नाव ऐकून चुलते दचकले व त्यांच्या तोडून शब्द उमटले,

"तेथे जाऊन काय करशील?"

"मी बऱ्याच दिवसांपासून प्रतीक्षा करीत होतो की तो दिवस कधी येईल, ज्या दिवशी तुमचे मन इस्लाम स्वीकारायला तयार होईल." अब्दुल उज्जा (रजि.) आकाशाकडे पाहून म्हणत होते. "तुम्ही व मी आपण दोघे...."

"चुप राहा!" चुलत्याने दटावले, "लात"ची शपथ तू मृत भावाची निशाणी नसता तर तुझ्या या दुष्कृत्याबद्दल अशी शिक्षा दिली असती की तू कधी विसरला नसता.

"तुम्हाला जे करायचे ते करा." अब्दुल उज्जा (रजि.) यांचा मौनबंध सुटला, "मी आता जास्त दिवस प्रतीक्षा करु इच्छित नाही."

"मी आता मुस्लिम होणार" त्याच्या आवाजात दृढता व परिपक्वता प्रदर्शित होत होती.

"तू मुहम्मद (स.) यांचा धर्म स्वीकारू इच्छितो?" चुलते जोरात ओरडले.

"होय." शांतपूर्ण स्वरात अब्दुल उज्जा (रजि.) यांनी बोलायला सुरुवात केली, "तोच धर्म ज्याने माझे, तुमचे व साऱ्या मानवतेचे कल्याण केले आहे."

"बघ....! हे लात व हुबल तुझा सर्वनाश करतील." चुलत्याने लाल लाल डोळ्यांनी बघत भयभीत करण्याचा प्रयत्न केला.

"आपण ऐकले नाही का? कालचीच घटना आहे?" अब्दुल उज्जा (रजि.) यांचे धैर्य वाढले होते, "मक्का जिंकले गेले आहे. अनेकेश्वरत्वाची घाण काबागृहातून काढून टाकण्यात आली आहे.

"पुतण्या....!" चुलत्याचा आवाज नरम पडत चालला होता.

"विचार कर, तू काय करायला निघालास."

"खूप विचारांती मी निर्णय घेतलाय !"

तू आपल्या पूर्वजांची परंपरा व धर्म सोडायला निघालास. लक्षात ठेव, त्यांचा आत्मा तुझा बदला घेईल.

"मी जितका विचार करतो, मूर्तीबद्दल माझा तिरस्कार वाढत जातो." अब्दुल उज्जा (रजि.) यांनी शांतपणे उत्तर दिले.

"पण लक्षात ठेव." चुलते कडू स्वरात म्हणाले, "ही धनसंपत्ती तुला घेऊन जाता येणार नाही."

"माझ्यासाठी माझे शरीर पुरेसे आहे." अब्दुल उज्जा (रजि.) यांनी उत्तर दिले.

"मृत्यु मात्र त्यापासून दूर करेल त्यापूर्वीच मी स्वत: यांचा त्याग करतो." दटावणीचे अब्दुल उज्जा (रजि.) यांनी सडेतोड उत्तर दिले.

चुलता रागाने फणफणू लागला, "तुला रिक्त हस्ताने जावे लागेल."

"माझ्याकारिता माझी श्रद्धा पुरेशी आहे."

"बघ....! आईच्या प्रेमाला तू कायमचा मुकशील?" चुलत्याने दुसऱ्या प्रकारे आक्रमण केले.

“महान पथदर्शक (स.) यांचा स्नेहपूर्ण व्यवहार माझ्या घायाळ मनावर मलमाचे काम करील.” अब्दुल उज्जा (रजि.) यांनी आपल्या चुलत्याने केलेला वाद निरूपयोगी ठरविला.

“आपल्या निर्णयाबद्दल पुन्हा विचार कर.”

“समजून उमजून हाच रस्ता मिळतो.”

“शरीरावर जे कपडे आहेत तेही येथेच काढावे लागतील.”

“माझा अल्लाह शरीर झाकण्याचा दुसरा काहीतरी मार्ग सुचवेल.” असे बोलून अब्दुल उज्जा (रजि.) यांनी आपले वस्त्र काढून टाकले. नग्न स्थितीत आईकडून विदा होण्यासाठी तो त्यांच्यासमोर उभा राहिला.

“हे काय?” आईने आश्चर्याने विचारले.

“मी एकेश्वरवादी झालो आहे. चुलत्याने सर्व कपडे काढून घेतलेत.” अब्दुल उज्जा (रजि.) यांनी उत्तर दिले.

आईने एक कंबल आणून दिले. अब्दुल उज्जाने त्याचे दोन तुकडे करुन केले.

(१)

आईने एक घोंगडे (कांबळी) आणून दिले. अब्दुल उज्जा (रजि.) यांनी त्याचे दोन तुकडे केले. एकाला कमरेवर बांधले व दुसरे खांद्यावर लटकवले व आईची रजा घेऊन मदीनेकडे रवाना झाले.

(२)

अब्दुल उज्जा (रजि.) सकाळच्या प्रहरी मस्जिदे-नबवीच्या जवळ पोहचले. ते बरेच थकले होते. मशिदीच्या भिंतीला टेकून बसले. पैगंबर मुहम्मद (स.) यांची त्यांच्यावर नजर पडली, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना विचारले, “तुम्ही कोण आहात व कुठून आलात?”

“मी यात्री आहे - माझे नाव अब्दुल उज्जा (रजि.) आहे; अल्लाहच्या पैगंबरांचे सान्नध्याचा लाभ घेण्याच्या उद्देशाने हजर झालो आहे.” अब्दुल उज्जा (रजि.) ने सविस्तर उत्तर दिले.

“आजपासून तुमचे नाव अब्दुल्लाह (रजि.) असे राहील.” पैगंबर मुहम्मद (स.) यांनी स्नेहपूर्वक सांगितले, “आणि ‘कांबळीचे दोन तुकडेवाला’ अशी उपाधी राहील.”

माननीय अब्दुल्लाह (रजि.) यांना सहाबे सुफ्फा (जे पैगंबरांकडून विशेष करुन धर्माची शिकवण प्राप्त करीत असत) मध्ये सामील करण्यात आले. ते अत्यंत श्रद्धेने मन लावून कुरआनचे अध्ययन करु लागले. ते उंच आवाजाने कुरआनचे पठण करीत.

एके दिवशी माननीय उमर (रजि.) यांनी पैगंबरांच्या दरबारात त्यांच्याविरुद्ध तक्रार केली, "ज्या वेळी लोक नमाज पढतात त्याच वेळी हा खेडूत कुरआनचे उंच स्वरात पठण करतो, त्यामुळे लोकांच्या नमाजामध्ये बाधा निर्माण होते."

"उमर (रजि.)....! याला दोष देऊ नका." पैगंबर मुहम्मद (स.) यांनी समज दिली, "हा तर अल्लाहकरिता आपले सर्व काही सोडून आला आहे."

(३)

तबुकच्या युध्दाची तयारी होत होती. माननीय अब्दुल्लाह (रजि.) अल्लाहच्या पैगंबर (स.) समक्ष हजर झाले व निवेदन केले,

"हे अल्लाहचे पैगंबरा ! प्रार्थना करा की मला युद्धात वीरगती प्राप्त होवो."

पैगंबर (स.) यांनी प्रार्थना केली, "हे अल्लाह ! मी काफिरांना यांचे रक्त हराम करीत आहे!"

"हे अल्लाहच्या पैगंबरा! मी तर वीरगतीची इच्छा व्यक्त केली होती." अब्दुल्लाह (रजि.) यांनी चकित होऊन निवेदन केले.

"घाबरु नका....!" अल्लाहचे पैगंबर म्हणाले, जर तुम्ही जिहादच्या उद्देशाने घरुन निघालात व प्रवासात तुम्हाला तीव्र ज्वराने मृत्यु आला तरी तुम्हाला वीरगती प्राप्त होईल."

आणि असेच घडून आले. तबूक पोहचल्यावर अब्दुल्लाह (रजि.) यांना ताप येऊ लागला. त्याच आजारात त्यांच्या मृत्यू झाला. तबूकच्या युद्धात त्यांना सामील होण्याची संधी प्राप्त झाली नाही. कारण दुश्मन युद्धासाठी आलेच नाही. तरीही माननीय अब्दुल्लाह (रजि.) यांना हौतात्म्य प्राप्त झाले. त्यांची दफनक्रिया रात्री पूर्ण करण्यात आली. त्या वेळी जे दृश्य ईर्षा निर्माण करणारे होते. इतर सहकाऱ्यांनी प्रभावित होत म्हटले की, "ही कबर माझ्याकरता असती तर किती बरे झाले असते."

माननीय बिलाल (रजि.) यांच्या हातात दिवा होता. माननीय अबू बकर (रजि.) व उमर (रजि.) त्यांच्या शवाला कबरीमध्ये ठेवत होते. पैगंबर मुहम्मद (स.) कबरीच्या आत उतरले होते व दोन्ही सहकाऱ्यांना सांगत होते.

आपल्या भावाला अत्यंत आदराने, पैगंबर (स.) यांनी कबरीवर आपल्याच पवित्र हाताने विटा लावल्या व नंतर प्रार्थना केली ,"हे अल्लाह! आज संध्याकाळपर्यंत मी यांच्याशी खूश होतो. तू पण यांच्यावर खूश हो!"

-०- समाप्त -०-